cmyk

संपादकीय

राजकीय वारे फिरले

भाजप हा मुंबई महापालिका आणि राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीवर नजर ठेऊन कामाला लागला आहे. 'पंचायत से पार्लमेंट तक' अशी भाजपाची रणनीती आहे आणि भाजपाच्या शिर्डी अधिवेशनात अमित शहा यांनी ती बोलून दाखवली. शहा यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना टीकेचे लक्ष्य करत जनतेने निवडून दिलेले युतीचे राज्य या दगाबाज मंडळींनी पाडले व पाठीत खंजीर खुपसला असे म्हटले. शरद पवार यांची सन ७८ पासूनचे दगाबाज राजकारण मतदारांनी दोनशे फूट जमिनीत गाडले व महायुतीला महाविजय दिला.

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२६६ | शुक्रवार, दि.१७ जानेवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

यंदा साखरेचे उत्पादन ५० लाख टनांनी घटणार!

१५ जानेवारी पर्यंत २० लाख टन घटीची नोंद, लांबलेला हंगाम अन् बदलत्या हवामानाचा झाला परिणाम

पुणे । प्रतिनिधी

गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी देशांतर्गत साखरेचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटण्याची शक्यता आहे. हंगामाच्या अखेरीस साखरेचे उत्पादन किमान ५० लाख टनांनी घसरण्याचा अंदाज आहे. ऊस पिकांवर पडलेला रोग, अवेळी झालेला पाऊस, कडाक्याच्या थंडीबरोबरच लांबलेल्या हंगामामुळे साखर उत्पादनात घट होताना दिसत आहे. याबरोबरच उताऱ्यातही मोठी घट झाल्याचे समोर येत आहे.

गेल्या वर्षी १५ जानेवारीपर्यंत देशात १५१.२० लाख टन साखर उत्पादन झाले होते. यावर्षी १५ जानेवारी अखेर हेच उत्पादन १३०.५५ लाख टनांपर्यंत खाली आले आहे. म्हणजे तब्बल २० लाख ६५ हजार टनांनी ते घटले आहे. एकूण उत्पादनाच्या १२.६६ टक्के ही घट आहे. गेल्या हंगामात देशात ३१९ लाख टन साखर उत्पादन झाले होते, या हंगामात ते २७० लाख टनांपर्यंत खाली येण्याची शक्यता आहे. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाने दिलेल्या माहितीनुसार, ऊस पिकावर होणारे रोग आणि प्रतिकूल हवामानामुळे यंदा साखर ◀◀ पान २ वर

उत्तर प्रदेशासह महाराष्ट्रातही घट

देशातील सर्वाधिक साखर उत्पादक राज्य असलेल्या उत्तरप्रदेशमध्ये १५ जानेवारीपर्यंत उत्पादन गेल्या वर्षीच्या ४६.१० लाख टनांवरून घटून ४२.८५ लाख टन झाले आहे. महाराष्ट्रात गेल्या वर्षी याच कालावधीत ५२.८० लाख टन साखरेचे उत्पादन झाले होते. यावर्षी हे उत्पादन घटून ४३.०५ टन झाले आहे. अशीच स्थिती कर्नाटकात असून, गेल्या वर्षी या राज्यात ३१ लाख टन साखर उत्पादन झाले होते, यावर्षी ते २७.१० लाख टनांपर्यंत खाली आले आहे.

बीडमधील १६२ जणांचे बंदूक परवाने रद्द

बीड । प्रतिनि

जिल्हाधिकाऱ्यांकडून १६२ लोकांचे बंदुक परवाने रद्द करण्यात आले आहेत, यांपैकी २० जणांचा यापूर्वीच मृत्यू झालेला आहे. खरंतर मृत्यूनतंर परवान्यासह शस्त्र सरकारकडे जमा करणे गरजेचे असताना ते करण्यात आलेले नव्हते. त्यामुळे या मृत्यू पावलेल्या लोकांचे देखील परवाने जिल्हाधिकाऱ्यांनी रद्द केले आहेत.

जिल्ह्यात सर्रास बेकायदा पद्धतीने कमरेला बंदुका लावून गुन्हेगार मंडळी फिरत असल्याचे अनेक व्हिडिओ देखील सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. यावरुन राज्यभरातच नव्हे तर देशभरात या प्रकरणांची चर्चा सुरु झाल्यानंतर आता बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी शस्त्र ◀◀ पान २ वर

अभिनेत्यावरील हल्ल्याने राज्यातील कायदा सुव्यवस्थेची लक्तरे वेशीवर !

राज्यात गृहमंत्री आहेत का? असे म्हणत काँग्रेसकडून महायुती सरकारवर जोरदार हल्ला

मुंबई । प्रतिनिधी

पद्मश्री पुरस्काराने सन्मानीत सुप्रसिद्ध चित्रपट अभिनेता सैफ अली खान यांच्यावर झालेला खुनी हल्ला महाराष्ट्राच्या कायदा सुव्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगणारा असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी गुरूवार दि. १६ जानेवारी रोजी केला.

नाना पटोले म्हणाले, मुंबईतील वांद्रे या वर्दळीच्या भागात अशा घटना होत असतील तर मुंबईत कोण सुरक्षित आहे? मुंबई, पुणे, बीड, परभणी, नागपूरमधील वाढत्या गुन्हेगारी घटना पाहता राज्यात गृहमंत्री आहेत का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. भाजपा युती सरकारमध्ये गुंडाराज फोफावले असून सैफ अली खान वरील हल्ला हे गुंडांनी महाराष्ट्राच्या कायदा सुव्यवस्था दिलेले आव्हान आहे. महायुती सरकारच्या काळात गुंडाराज फोफावले असून हे सरकारचे अपयश आहे, असा घणाघाती हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. राज्यातील कायदा सुव्यवस्थेच्या प्रश्नावर भाजप सरकारचा समाचार घेताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, भाजप सरकारमध्ये गुन्हेगारांचे मनोबल वाढले असून मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह त्यांच्या लाडक्या पोलिस महासंचालक अत्यंत निष्क्रीय आहेत. मुंबईला दोन पोलिस आयुक्त आहेत तरीही ना राज्यात कायदा सुव्यवस्था आहे ना मुंबईत, असे ते म्हणाले. ◀◀ पान २ वर

या घटनेवरून मुंबई असुरक्षित म्हणता येणार – मुख्यमंत्री फडणवीस

विरोधकांच्या प्रश्नांना उत्तर देताना या घटनेमुळे मुंबई असुरक्षित आहे असे म्हणता येणार नाही, असे सांगत विरोधकांच्या आरोपाला मुख्यमंत्री फडणवीस यांनी केराची टोपली दाखविली. फडणवीस म्हणाले की, विरोधकांकडून विनाकारण कायदा व सुव्यवस्थेबाबत प्रश्न निर्माण केला जात आहे. तसेच मुंबई असुरक्षित असल्याचा आरोप करत आहेत. मात्र या हल्ल्यामुळे मुंबई असुरक्षित झाली असे म्हणता येणार नाही. देशातील मेगासिटींचा विचार केला तर मुंबई हे फारच सुरक्षित असलेले शहर आहे. या घटनेची पोलिसांनी दखल घेतली असून या संदर्भात तपासही करण्यात येत आहे. त्याचबरोबर ही घटना आणि हल्ला कशामुळे झाला याची माहिती पोलिसांनी प्रसारमाध्यमांनाही दिली आहे. त्यामुळे मुंबई असुरक्षित आहे असे कदापी म्हणता येणार नाही असे यावेळी ते म्हणाले.

सैफवर हल्ला करणाऱ्याची ओळख पटली

अभिनेता सैफ अली खानवर हल्ला करणाऱ्या आरोपीची ओळख पटली असल्याची माहिती मुंबई पोलिसांनी दिली आहे. या आरोपीने चोरीच्या उद्देशानेच सैफच्या घरी प्रवेश केला असून त्याच्यावर या आधीही घरफोडीचे अनेक गुन्हे नोंद असल्याची माहिती पोलिसांनी दिली. आरोपी हा सराईत घरफोड्या असल्याची माहिती समोर येत आहे. चोरी करण्यापूर्वी त्याने सैफ अली खानच्या घराची रेकी केल्याचीही माहिती आली. आरोपीने शेजारच्या इमारतीतून सैफ अली खानच्या इमारतीत प्रवेश केला. त्यानंतर त्याने पाईप आणि फायर एस्केप पायऱ्यांच्या माध्यमातून सैफच्या घरी प्रवेश मिळवला. सहाव्या मजल्यावरील सीसीटीव्हीमध्ये या हल्लेखोराचा चेहरा स्पष्ट दिसतो. सैफवर हल्ला केल्यानंतर हा आरोपी बाहेर पडताना दुसऱ्या इमारतीतील सीसीटीव्हीमध्ये कैद झाले आहे. त्यामध्ये आरोपीच्या तोंडावर काळे फडके असल्याचे दिसत आहे.

जखमेमुळे सैफला पॅरालाईजचा धोका होता– डॉक्टर

बॉलिवूड अभिनेता सैफ अली खान याच्यावर मुंबईतील राहत्या घरी एका चोरट्याने हल्ला केला होता. त्यानंतर तो गंभीररित्या जखमी झाला होता. त्याला उपचारांसाठी मुंबईतील लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. यावेळी त्याच्यावर एक सर्जरी करण्यात आली. दरम्यान सैफवर उपचार करणारे डॉ.नितीन डांगे म्हणाले, सध्या सैफ अली खान यांची प्रकृती स्थिर आहे. त्यांना आता काहीही प्रॉबलेम नाही. ऑबझर्वेशनसाठी आम्ही त्यांना आयसीयूमध्ये ठेवलेले आहे. कारण बराच वेळ शस्त्रक्रिया चालली होती. चाकू डिपमध्ये गेल्याने मज्जातंतूच्या जवळपास इजा झाली होती. पाठितील जे पाणी असते, ते लीक होत होते. चाकूचा एक पार्ट त्यांच्या स्पायनल कॉर्डच्या जवळ घुसला होता. तो डीप होता त्यामुळे सर्जरी करण्याचा निर्णय घेतला. यावेळी त्यांना पॅरालाईजचा धोका निर्माण होता, असे डॉक्टर म्हणाले.

दिल्लीसाठी भाजपचे सर्व उमेदवार जाहीर, २ जागा मित्रपक्षाला

नवी दिल्ली : दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने ९ उमेदवारांसह चौथी यादी जाहीर केली. ७० सदस्यीय दिल्ली विधानसभेसाठी भाजपने आतापर्यंत ६८ उमेदवार जाहीर केले आहेत. चौथ्या यादीत ग्रेटर कैलासमधून आप उमेदवार आणि दिल्ली सरकारमधील मंत्री सौरभ भारद्वाज यांच्या विरोधात भाजपने शिखा राय यांना उमेदवारी दिली आहे. तर दिल्ली आपचे प्रदेशाध्यक्ष आणि बाबरपूरचे उमेदवार गोपाल राय यांच्या विरोधात अनिल वशिष्ठ यांना उमेदवारी दिली आहे. दरम्यान, ७० पैकी उर्वरित २ जागा एनडीएमध्ये मित्रपक्ष असलेल्या जदयुला भाजपने सोडल्याचे समजते. पुर्वांचलमधील मतदारांना आपल्याकडे वळवणे तसेच मित्रपक्षांना खुश ठेवणे अशा दोन्ही गोष्टी याद्वारे साध्य करण्याचा प्रयत्न भाजपने केला आहे.

छत्तीसगडमध्ये १२ नक्षलवादी ठार

विजापूरः छत्तीसगडमध्ये विजापूर जिल्ह्यातील उसूर ब्लॉकच्या पुजारी कांकेर आणि मरुडबाकाच्या जंगलात गुरुवारी सुरक्षा जवान आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली. सुरक्षा दलांनी चकमकीत १२ नक्षलवाद्यांचा खात्मा केला आहे. विजापूर आणि तेलंगणाच्या सीमेवर असलेल्या ◀◀ पान २ वर

दै.राज्य लोकतंत्रच्या उपक्रमाचे विधिज्ञांकडून कौतूक

लॉयर्स डायरीचे उत्साहात स्वागत करून पुढील वाटचालीस दिल्या शुभेच्छा

बीड । प्रतिनिधी

अल्पावधीतच जनतेच्या पसंतीस उतरलेल्या दै.राज्य लोकतंत्रकडून नेहमीच सामाजिक उपक्रम राबविले जातात. लोकतंत्रच्या वतीने दरवर्षी लॉयर्स डायरी छापून ती वर्षाच्या सुरूवातीला विधिज्ञांच्या हाती दिली जाते. सर्वसामान्य डायरीपेक्षा वेगळी आणि खास विधिज्ञांसाठी उपयुक्त असलेल्या या डायरीचे दरवर्षी उत्साहात स्वागत केले जाते. यंदाही या डायरीचे जोरदार स्वागत करण्यात आले असून, विधिज्ञांनी दै.राज्य लोकतंत्रच्या या उपक्रमाचे भरभरून कौतूक केले आहे. यावेळी सर्वांनीच दै.राज्य लोकतंत्रच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

गेल्या काही वर्षापासून राज्य लोकतंत्रच्या वतीने लॉयर्स डायरी प्रकाशित करण्यात येते. संपादक गणेश मोकाशे यांच्या संकल्पनेमधून पुणे जिल्हा न्यायालयातील वकिलांसह बीड जिल्हा न्यायालयातील वकिलांना या डायऱ्या मोफत देण्यात येतात. वर्षाच्य सुरूवातीलाच पुणे येथे आयोजित केलेल्या एका दिमाखदार कार्यक्रमात विधिज्ञ डायरीचे वाटप करण्यात आले. यावेळी पुणे येथील न्यायालयातील

शेकडो विधिज्ञांची उपस्थिती होती. सर्वांनीच या डायरीचे स्वागत करताना दै. राज्य लोकतंत्रच्या उपक्रमाचे कौतूक केले. पुण्यातील कार्यक्रमानंतर बीड येथे बुधवार दि. १५ रोजी बीड जिल्हा सरकारी वकील अजय राख यांच्या कार्यालयामध्ये मान्यवर वकिलांच्या उपस्थितीत लॉयर्स डायरीचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी वकील बांधवाची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. गतवर्षी दिलेल्या डायऱ्यांची उपयोगिता सांगतांना अनेक विधिज्ञांनी यावेळी आपले अनुभव कथन केले आणि या तंत्रशुद्ध डायरीचा किती चांगला उपयोग झाला ते सांगितले. ◀◀ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१६ जानेवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू: ६.०० क्विंटल			
	३,१५०	३,१९०	३,१७०
ज्वारी/हायब्रिड : १.०० क्विंटल			
	२,१८१	२,१८१	२,१८१
मका/लोकल: ७.०० क्विंटल			
	२,१५०	२,१५०	२,१५०
तूर : ९३.०० क्विंटल			
	६,७००	७,२४५	७,०५०
उडीद : २.५० क्विंटल			
	६,५०१	६,५७५	६,५३८
बाजरी: ८.०० क्विंटल			
	२,४८०	२,९६०	२,७७७
मुग : ०.५० क्विंटल			
	६,५००	६,५००	६,५००
सोयाबीन: ८५.५० क्विंटल			
	३,८९६	४,१५३	४,०२१
हरभरा: १.५० क्विंटल			
	५,८०१	६,०००	५,९००

केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी खूश खबर !

आठव्या वेतन आयोगाला मंजूरी, केंद्रीय मंत्रीमंडळाचा मोठा निर्णय

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

केंद्र सरकारच्या कॅबिनेट बैठकीत केंद्रीय कर्मचाऱ्यांना आठव्या वेतन आयोग देण्यास सहमती दर्शवली आहे. अनेक महिन्यांपासून सरकारी कर्मचाऱ्यांकडून आठवा वेतन आयोग लागू करण्याची मागणी लावून धरली होती. याला मंजुरी मिळाल्याने केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या पगारात भरघोस वाढ होणार आहे. मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबत गुरूवारी (दि.१६) पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली.

यापूर्वी केंद्रीय कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार पगार मिळत होता. २०१४ मध्ये सातव्या वेतन आयोगाची घोषणा झाली होती. २०१६ मध्ये हा वेतन आयोग लागू करण्यात आला होता. दर दहा वर्षांनी नवीन वेतन आयोग लागू केला जातो. दरम्यान, आता आठवा वेतन आयोग लागू करण्याची घोषणा करण्यात आली आहे. ◀◀ पान २ वर

असे वाढू शकते वेतन

आठव्या वेतन आयोगात कर्मचाऱ्यांच्या पगारात बंपर वाढ होण्याची शक्यता आहे. अहवालानुसार अंतर्गत फिटमेंट फॅक्टर किमान २.८६ निश्चित केला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या किमान मूळ वेतनात समान वाढ होऊ शकेल. ती वाढ ५१ हजार ४८० रुपये होऊ शकते. सध्या किमान मूळ वेतन १८ हजार रुपये आहे. यासोबतच निवृत्तीवेतनधारकांनाही हाच लाभ मिळणार आहे. त्यांचे किमान पेन्शन सध्याच्या ९ हजार रुपयांवरून २५ हजार ७४० रुपयांपर्यंत वाढणार आहे.

दिल्ली विधानसभेसाठी राष्ट्रवादीचे २० स्टार प्रचारक जाहीर

धनंजय मुंडे, भूजबळांना स्थान नाही, पार्थ पवारांना संधी

मुंबई । प्रतिनिधी

दिल्ली विधानसभेच्या निवडणुका फेब्रुवारी महिन्यात होत आहेत. भाजप, काँग्रेस आणि आम आदमी पक्षामध्ये प्रामुख्याने ही निवडणूक होत असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षही मैदानात उतरत आहे. अजित पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसनेही दिल्ली विधानसभेसाठी रणशिंग फुंकले असून येथील निवडणुकांसाठी स्टार प्रचारकांची यादी जाहीर करण्यात आली आहे. त्यामध्ये, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेंचे नाव आहे. मात्र, विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादीचे स्टार प्रचारक राहिलेल्या मंत्री धनजंय मुंडेंचे नाव नसल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. विशेष म्हणजे

राष्ट्रवादीच्या २० स्टार प्रचारकांच्या यादीत अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांचे नाव आहे तर ज्येष्ठ नेते छगन भूजबळ यांचेही नाव नाही

देशाची राजधानी आणि केंद्र शासित प्रदेश असलेल्या दिल्ली विधानसभेतील ७० जागांसाठी ५ फेब्रुवारीला मतदान होत असून ८ फेब्रुवारी रोजी निवडणुकांचा निकाल जाहीर होणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर भाजपकडून सर्वच उमेदवारांच्या नावांची यादी जाहीर करण्यात आली आहे. दुसरीकडे अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने दिल्ली विधानसभेसाठी कंबर कसली असून, आत्तापर्यंत ११ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. आता, राष्ट्रवादीकडून दिल्ली विधानसभेसाठी स्टार प्रचारकांची यादी जाहीर करण्यात आली आहे. ◀◀ पान २ वर

cmyk

अग्रलेख

राजकीय वारे फिरले

भाजप हा मुंबई महापालिका आणि राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीवर नजर ठेऊन कामाला लागला आहे. 'पंचायत से पार्लमेंट तक' अशी भाजपाची रणनीती आहे आणि भाजपाच्या शिर्डी अधिवेशनात अमित शहा यांनी ती बोलून दाखवली. शहा यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना टीकेचे लक्ष्य करत जनतेने निवडून दिलेले युतीचे राज्य या दगाबाज मंडळींनी पाडले व पाठीत खंजीर खुपसला असे म्हटले. शरद पवार यांची सन ७८ पासूनचे दगाबाज राजकारण मतदारांनी दोनशे फूट जमिनीत गाडले व महायुतीला महाविजय दिला, यासाठी जनतेचे, कार्यकर्त्यांचे त्यांनी आभार मानले व 'पार्लमेंट से पंचायत तक' हे टार्गेट बोलून दाखवले या अधिवेशनानंतर राज्यातील राजकारणाचे वारे बदलले आहे. दिशा स्पष्ट झाली आहे.

महाविकास आघाडीत फुटाफूट, वाद दिसू लागले आहेत. शिवसेना उद्धव ठाकरे गटाने आपण मुंबई महापालिका स्वतंत्र लढवणार असे म्हटले आहे तर काँग्रेसनेही आपली भुमिका मांडली आहे. शरद पवार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे गुणगान गाऊ लागले आहेत पण अमित शहा यांची टीका शरद पवारांना चांगलीच झोंबली आहे. तडीपार गृहमंत्री असा उल्लेख करत पवारांनी शहा यांनी केलेले सर्व आरोप फेटाळले आहेत. शहाच्या या घणाघाती टीकेने महाराष्ट्रातील राजकीय वारे पूर्ण बदलले आहे. राष्ट्रवादी शरद पवार गट आणि शिवसेना ठाकरे गट यांच्याकडे खासदार संख्या बरी आहे हे खासदार 'एनडीए'मध्ये सामील झाले तर भाजप आघाडी सरकार बळकट होणार आहे. त्यासाठी होत असलेल्या भेटीगाठी आणि सामना अग्रलेखातून स्तुतीसुमने यांची चर्चा होत आहे. शरद पवार संक्रांतीला तीळगुळ वाटणार असे वारे वाहत होते पण अमित शहा यांनी जो राग आळवला तो या सर्व शक्यता मोडीत काढणाऱ्या ठरल्या. राष्ट्रवादी शरद पवार गटातील अंतर्गत चांगले वातावरण नाही, विधानसभा निवडणूक निकाल आणि जयंत पाटील यांचे व्यक्तिमत्त्व याचे दाखले देत नवा प्रदेश अध्यक्ष निवडा तो मराठा नको अशी जाहीर मागणी झाली आहे. शरद पवारांनी निवडणूक प्रचारा दरम्यान जयंत पाटील महत्त्वाचे नेते आहेत, त्यांना मोठी जबाबदारी देणार असे म्हटले होते. तेव्हाच राजकीय अभ्यासकांनी भुवया उंचावल्या होत्या. शरद पवारांना भाकरी फिरवायची आहे. रोहित पवार आणि रोहित आर आर पाटील यासह तरुणांना पक्ष संघटनेत संधी द्यायची आहे. त्यामुळे या गटात राजी-नाराजी सुरू आहे. काही मंडळी अजितदादा पवार यांच्या संपर्कात आहेत. पण म्हैस पाण्यात आहे.

काँग्रेस आणि इंडी आघाडीत बरे वातावरण नाही. इंडी आघाडीचे नेतृत्व ममता बॅनर्जी यांचेकडे सोपवावे अशी मागणी होते आहे. ठाकरेची शिवसेनाही अस्तित्वाची लढाई लढताना दिसते आहे. मुंबई महापालिका ताब्यातून गेली तर ठाकरे व त्यांचा पक्ष अडचणीत येणार हे वेगळे सांगायला नको. अजितदादा धनंजय मुंडेमुळे राजकीय अडचणीत आहेत तर एकनाथ शिंदे शांत असले तरी गप्प नाहीत. बाळासाहेब ठाकरे स्मारक समितीवरून उद्धव ठाकरे यांना दूर करा, अशी त्यांनी मागणी केली आहे. जरांगे विधानसभा निवडणुकीत महायुतीचा महाविजय बघून पुन्हा ॲक्टिव्ह झाले आहेत. मोर्चे, आंदोलन, इशारे, फडणवीस यांच्यावर चिखलफेक पुन्हा सुरु झाली आहे. एकुणच भक्कम सरकार येऊनही राजकारणात संयम, सहकार्य, संवाद आणि लोककल्याणासाठी पावले पडताना दिसत नाहीत.

मुंबई महापालिका निवडणुकांच्या हालचाली सुरु झाल्या असून त्याचे वेध आता महाआघाडी व महायुती यांना लागले आहेत. उद्धव ठाकरे यांनी शिवसेना मुंबईत एकट्याने लढणार असल्याचे वक्तव्य केले आहे. त्याचे काय होते, हे पाहावे लागेल. याबाबतीत काँग्रेस, शरद पवार यांची भूमिका काय असेल हेही कालानुरुप कळेल. मुंबई महापालिका निवडणुकीसाठी घमासान होणार, रुसवे राग-लोभ उफाळून येणार, हेही ओघाने आलेच. उद्धव ठाकरे यांची शिवसेना अस्तित्वासाठी शर्थीचे प्रयत्न करणार आहे. या दरम्यान फोडाफोडीचे राजकारण बहरात येणार, हे उघड आहे. देवाभाऊ पूर्ण ताकदीने मैदानात उतरणार, सर्व हिशोब पूर्ण करण्यासाठी खेळी खेळणार हे वेगळे सांगायला नको. नव्हे त्यासाठी पावले पडू लागली आहेत. एकूण काय महाराष्ट्राचे राजकीय वारे पूर्णांशाने फिरले आहे.

किसान मोर्चाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी सदस्य नोंदणीचे टार्गेट पूर्ण करावे-राजेश मोरे

जालना । प्रतिनिधी

दि १४ पासून २० तारखेपर्यंत मतदार संघातील गावागावातील भाजप किसान मोर्चाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी गावात राहून काही दिवस स्वत:ला झोकून देऊन सदस्यता नोंदणी करावी असे आवाहन भाजप किसान मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष राजेश मोरे यांनी केले. ते शिवणगिरी येथे भाजपा सदस्यता नोंदणी अभियानांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बोलत होते.

भारतीय जनता पार्टीसह पक्षाच्या सर्व प्रकोष्ठांनी आपल्याला दिलेले उद्दिष्ट येत्या चार दिवसात पूर्ण करणे गरजेचे असून जगातील सर्वात मोठ्या पक्षाचे सदस्य नोंदवण्याची जबाबदारी ही तुमच्यावर असून देशाचे पंतप्रधान नरेंद्र जी मोदी, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखरजी बावणकुळे, गणेश जी भेगडे यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रात भारतीय जनता पार्टी हा सर्वात मोठा पक्ष असून केंद्र व राज्य सरकारने विविध योजना राबवून सर्वसामान्य जनतेला न्याय देत विविध योजना घराघरापर्यंत पोहोचवल्या. त्यामध्ये प्रामुख्याने लाडकी बहीण, शेतकऱ्यांसाठीच्या वैयक्तिक लाभांच्या विविध योजना, घरकुल यासारख्या योजनाचा लाभ प्रत्यक्ष सर्वसामान्यांपर्यंत पोहोचला असून या सर्वांना भारतीय जनता पार्टीशी जोडून घेण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले. पुढे बोलताना ते म्हणाले की, भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता हा चिवट कार्यकर्ता असून या झुंजार कार्यकर्त्यांनी पक्षाला एवढ्या मोठ्या स्थानापर्यंत आणून पोचवले आहे. त्यामुळे आपणही संपूर्णपणे आपली ताकद पणाला लावून नोंदणी करावी असेही ही यावेळी बोलताना ते म्हणाले. भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष राजेश मोरे यांनी मंठा तालुक्यातील शिवनगिरी येथे बैलगाडीतून भाजपा सदस्यता नोंदणी अभियानाचा प्रारंभ केला. जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

धनंजय मुंडेंचा परळीत जनता संवाद, जगमित्र कार्यालय गजबजले

नियमित प्रमाणे प्रभू वैद्यनाथांचे घेतले दर्शन

परळी वै. । प्रतिनिधी

नियमित प्रमाणे परळीत आल्यानंतर आज राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी परळी येथील आपल्या जगमित्र या कार्यालयामध्ये बसून मतदारसंघातून व मतदारसंघ बाहेरून आलेल्या नागरिक कार्यकर्ते तसेच पदाधिकारी यांच्याशी संवाद साधत त्यांची कामे अडचणी समजून घेतल्या तसेच ती मार्गी लावण्याबाबत संबंधितांना योग्य त्या सूचना देत संबंधितांची कामे मार्गी लावली.

जागच्याजागीच काम मार्गी लावण्याचा शैलीमुळे धनंजय मुंडे यांच्या जनता संवाद उपक्रमास नेहमीच गजबजलेली गर्दी पाहायला मिळते. आजही धनंजय मुंडे जगमित्र कार्यालयात दाखल झाल्यानंतर पदाधिकारी कार्यकर्ते त्याचबरोबर परळी व परळी बाहेरील नागरिकांनी जगमित्र हे धनंजय मुंडे यांचे कार्यालय गजबजलेले पाहायला मिळाले. मंत्री धनंजय मुंडे हे परळीत असल्यानंतर नियमित प्रभू वैद्यनाथांच्या दर्शनाला जातात. आजही घराबाहेर पडतात त्यांनी सर्वप्रथम बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथांचे मनोभावे दर्शन करून विधिवत पूजन केले व त्यानंतर ते जनता संवाद उपक्रमासाठी त्यांच्या जगमित्र या कार्यालयात दाखल झाले.

सरस्वती विद्यामंदिरचा बागल अनुज आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत सर्वप्रथम

बीड । प्रतिनिधी

येथिल शिवाजीनगर भागातील सरस्वती विद्यामंदिरचा वर्ग- ६वीर विद्यालय बीड द्वारा आयोजित कै.नरेश चौसाळकर स्मृती प्रीत्यर्थ घेण्यात आलेल्या आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत प्रशालेच्या स्पर्धात्मक यशाची परंपरा कायम राखली आहे.

संस्कार विद्यालय बीड द्वारा कै.नरेश चौसाळकर स्मृतिप्रीत्यर्थ घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत 'कृत्रीम बुद्धीमत्ता आणी शिक्षण एक नवा दृष्टिकोन' या विषयावर अतिशय उत्कृष्ट असे वक्तृत्व करत सदरील स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत रोख रू.५०१ चे बक्षीस पटकावत प्रशालेचे व पालकांचे नाव उज्ज्वल केले आहे. त्याच्या या यशाबद्दल त्याचे तसेच पालकांचे व मार्गदर्शक शिक्षक श्री.घोलप सर श्रीम.वाघ मॅडम आदिंचे संस्थेचे संस्थापक सचिव मा.श्री.उत्तमराव पवार साहेब तसेच सर्व संचालक मंडळासह प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.गोरे सर आदिंनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे

फटाक्याचे आवाज काढणाऱ्या सायलेन्सवर बीड शहरात पुन्हा कारवाई ; ५१४३ हजाराची दंडात्मक कारवाई

बीड । प्रतिनिधी

शहरासह बीड जिल्ह्यामध्ये फटाक्याचे आवाज काढणाऱ्या बुलेटचे सायलेन्सर काढून त्यावर रोलर फिरवण्याचा प्रकार पाठीमागे अनेकदा जिल्हा वाहतूक शाखेच्या टीमने केला असतानाच पुन्हा एकदा बीड शहरात गुरुवार दिनांक १६ नोव्हेंबर रोजी कारवाई हाती घेण्यात आली. या कारवाईमध्ये ११ बुलेट चे सायलेन्सर काढण्यात येण्याबरोबरच ५१ केसेस करून ४३ हजार ५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला.

बीड जिल्हा वाहतूक शाखेच्या वतीने वाहतूक कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व वाहन नियमाची दखल न घेणाऱ्या वाहनधारकावर गेले काही महिन्यापासून कारवाईचा सपाटा लावलेला आहे. पाठीमागील काही दिवसाखाली शहर वाहतूक शाखेचे सपोनि सुभाष सानप आणि त्यांच्या टीमने फटाक्याचे आवाज काढणाऱ्या बुलेटचे सायलेन्सर काढून त्याच्यावर रोलर फिरवण्याचे काम केले होते . याची धास्ती घेऊन कित्येक बुलेट चालकांनी असे बसविलेले सायलेन्सर देखील काढले होते. परंतु काही लोक या सदर्भात दखल घ्यायला तयार नव्हते. फटाक्याचे आवाज काढणाऱ्या बुलेटमुळे मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण होत असतानाच असा आवाज निघताच लहान मुले देखील दचकण्याचे प्रकार होऊ लागले. तेव्हा सपोनी सुभाष सानप आणि त्यांच्या टीमने गुरुवार दिनांक १६ जानेवारी रोजी सायंकाळी बस स्थानकासमोर अशा बुलेटचे सायलेन्सर काढण्याची मोहीम राबवली. यात ११ बुलेटचे सायलेन्सर काढण्यात आले. तर सुमारे ५१ वाहनावर केसेस करून सुमारे ४३ हजार ५०० रुपयांचा दंड करण्यात आला.यात नेम प्लेटवर मामा, काका, दादा असा उल्लेख असलेल्या व फॅन्सी नंबर टाकलेल्या कर्कश हॉर्न बसवलेल्या वाहनांचा समावेश आहे. दरम्यान पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सदर मोहीम जिल्ह्यात सतत राबविण्यात येणार असून ज्या बुलेटच्या मालकांनी अशा प्रकारचे आवाज देणारे सायलेन्सर बसवले असतील, त्यांनी हे सायलेन्सर काढून दंडात्मक कारवाईसह नुकसान टाळावे. असे आवाहन सपोनि सुभाष सानप यांनी केले. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतूक शाखेचे पोनि सुभाष सानप, फौ. बजरंग कुटुंबरे, फौ. वसुदेव मिसाळ या पोलीस अधिकाऱ्यासह जिल्हा वाहतूक शाखेतील पोलीस कर्मचारी दत्तात्रय उबाळे, नारायण दराडे, शांतीलाल गर्जे, त्र्यंबक कुडके, सचिन साळवे, संतोष हारके, नितीन काकडे, नारायण वाघमारे आदी पोलीस अंमलदार, पोलीस शिपाई यांनी केली.

वादळ वाऱ्यामुळे सोलारची नुकसान

घनसावंगी । प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातील बोरगाव येथे अचानक वादळ वाऱ्यामुळे श्री अमोल साईनाथ भानुसे या शेतकऱ्याचं शेतामध्ये असल्याने सोलरची नुकसान झाले आहे. बोरगाव येथील शेतकरी अमोल भानुसे याची शेत जमीन बोरगाव खुर्द शिवारात गट नंबर ४४ असून त्यांना इकोझन कंपनीचे कुसुम सौर अंतर्गत सोर कृषी पंपाचा लाभ मिळाला होता. ११/०१/२०२५ रोजी वादळे वारे झाल्यामुळे सोलारच्या दोन पाट्या फुटल्या सदर स्वर पंपाचे १४०६००१९ हा क्रमांक आहे याची नुकसान झाले आहे.

यूजीसीकडून राजस्थानमधील विद्यापीठांच्या पीएचडी अभ्यासक्रमावर घातली बंदी

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) राजस्थानमधील तीन विद्यापीठांत पुढील पाच वर्षांसाठी पीएचडी अभ्यासक्रमावर बंदी घातली आहे. नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी कारवाईचा बडगा उगारला आहे. यासंदर्भातील माहिती आयोगाने गुरूवार (दि.१६) त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया एक्स अकाऊंटच्या माध्यमातून दिली आहे.

युजीसीने म्हटले आहे की, ''राजस्थानमधील ओपीजेएस विद्यापीठ चुरु, सनराइज विद्यापीठ अलवर, आणि सिंघानिया विद्यापीठ झुंझुनू या तीन विद्यापिठांना पुढील पाच वर्षांसाठी म्हणजेच शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ते २०२९-३० पर्यंत पीएचडी कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना नोंदणी करण्यास बंदी घालण्यात आली आहे''. संबंधित शिक्षण संस्था यूजीसी पीएचडी नियमांच्या तरतुदींचे पालन करण्यात अयशस्वी ठरल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष एम. जगदेश कुमार यांनी याविषयी माहिती देताना म्हटले आहे की, ''पीएचडी कार्यक्रमामध्ये सर्वोच्च दर्जा राखण्यासाठी विद्यापीठांनी वचनबद्ध असले पाहिजे. यूजीसीच्या पीएचडी नियमांचे पालन न करणाऱ्या संस्थांवर यूजीसी योग्य ती कारवाई करेल. आम्ही काही इतर विद्यापीठांमधील पीएचडी कार्यक्रमांची गुणवत्ता तपासण्याच्या प्रक्रियेत आहोत.

पान १ वरून...

यंदा साखरेचे उत्पादन ५०

उत्पादनाला मोठा फटका बसला आहे. इथेनॉल उत्पादनासाठी वळवलेल्या साखरेव्यतिरिक्त हे साखर उत्पादन आहे. ऊस पिकावर लाल कुजणे व इतर रोगांचा प्रादुर्भाव झाला आहे. याव्यतिरिक्त तीव्र उष्णतेनंतर हिवाळा उशिरा सुरू झाल्यामुळे साखर कारखान्यांचे कामकाज सुरू होण्यास विलंब झाला याचाही फटका साखर उत्पादनाला बसला आहे. केवळ साखर उत्पादनच नाही तर उताऱ्यातही मोठी घट सर्वच राज्यात झाली आहे. १५ जानेवारीपर्यंत देशातील साखरेची सरासरी रिकव्हरी ८.८१ होती. जी मागील वर्षी याच कालावधीत ९.३७ टक्के होती. उत्तरप्रदेशात ९.९० वरून ९.०५, तर महाराष्ट्रात ८.९५ वरून ८.८० टक्के पर्यंत उतारा घसरला आहे. सर्वाधिक उताऱ्यातील घट कर्नाटक राज्यात झाली आहे, त्याला कारण या राज्यात झालेली अतिवृष्टी आहे. साखर उत्पादनात झालेली घट आणि पुनर्प्राप्ती हे साखर उद्योगासमोर मोठे आव्हान आहे. परिणामी, साखरेचा हमीभाव आणि इथेनॉलची किंमत वाढवावी, असा आग्रह साखर उद्योगातून होत आहे.

अभिनेत्यावरील हल्ल्याने राज्यातील

बीडमधील संघटीत गुन्हेगारी व त्याला असलेले राजकीय आशीर्वाद, परभणीत पोलिस कोठडीत मृत्यू, माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांची गोळ्या घालून हत्या, अभिनेता सलमान खानच्या घरावर गोळीबार या गंभीर घटना आहेत. गृहमंत्री पद सांभाळण्यात फडणवीस अपयशी ठरले आहेत. राज्यात सोलिब्रिटी, सत्ताधारी पक्षाचे नेते, सर्वसामान्य जनता कोणीही सुरक्षित नाही, असे पटोले म्हणाले.

बीडमधील १६२ जणांच

परवान्यांबाबत महत्वाची कारवाई केली आहे. त्यानुसार जिल्ह्यातील १६२ जणांचे बंदुकांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. यांपैकी १४० जण गुन्हेगार आहेत. या लोकांवर विविध प्रकारे गुन्हे दाखल असल्याचे चौकशीत समोर आले आहे. विशेष म्हणजे यांचा राजकीय लोकांशी संबंध असल्याचेही समोर आले आहे.

छत्तीसगडमध्ये

तीन जिल्ह्यांतील नक्षलवाद्यांविरोधात सैनिक मोठी कारवाई करत आहेत. गुरुवारी सुरक्षा कर्मचाऱ्यांचे संयुक्त पथक नक्षलविरोधी मोहिमेवर निघाले होते. सकाळी नऊच्या सुमारास दक्षिण विजापूरच्या जंगलात गोळीबार सुरू झाला. याआधी १२ जानेवारी रोजी विजापूरच्या माडेड पोलीस स्टेशन परिसरात सुरक्षा जवानांशी झालेल्या चकमकीत दोन महिलांसह पाच नक्षलवादी ठार झाले होते. दरम्यान, नक्षलवाद्यांनी या महिन्याच्या सुरुवातीला विजापूर जिल्ह्यात ६० ते ७० किलो वजनाचे स्फोटक यंत्र वापरून एक वाहन उडवले होते, या घटनेत आठ सुरक्षा कर्मचारी ठार झाले होते.

दै.राज्य लोकतंत्रच्या उपक्रमाच

याप्रसंगी जिल्हा सरकारी वकील अजय राख, सरकारी वकील वाय पी सरवदे, सरकारी वकील अजय तांदळे, सरकारी वकील अनिल तिडके, ॲड. प्रदीप मस्कर, ॲड. अमित हसेगावकर,ॲड. पी व्ही. दगडखैर, ॲड. राजेंद्र कोरडे, ॲड. जुबेर खान, ॲड. व्ही एस मिसाळ, ॲड.राजेश सानप, ॲड. ए. पी. रोकडे, ॲड. जी बी कुलकर्णी, ॲड. जे एल पठाण, ॲड. आर. एल लोखंडे,ॲड. बी एस राख, ॲड. बीबी गीते, ॲड. एस व्ही सुलाखे, ॲड. व्ही एस ढाकणे, ॲड. एस व्ही आंधळे, ॲड.ए. एन बारगजे, ॲड. जे एल पठाण, दै. लोकतंत्रचे कार्यकारी संपादक अशोक खाडे, दिलीप शिंगाडे, अक्षय मोरे उपस्थित होते. उपस्थित असलेल्या सर्वच विधिज्ञांनी दै.राज्य लोकतंत्रच्या या उपक्रमाचे कौतूक करीत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी

आठव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीनंतर केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या पगारात मोठी वाढ होणार आहे. अर्थसंकल्पापूर्वी मोदी सरकारने केंद्रीय कर्मचाऱ्यांना मोठी बातमी दिली आहे. आठव्या वेतन आयोगाला मंजुरी देऊन सर्व कर्मचाऱ्यांना खूश केले आला आहे. केंद्रीय कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ५३ टक्क्यांवर गेला आहे. त्यावेळी मोदी सरकारने हा निर्णय घेतला आहे. केंद्रीय कर्मचारी आणि पेन्शनधारक अनेक महिन्यांपासून आठव्या वेतन आयोगाच्या प्रतिक्षेत होते. आता सरकारने त्यांची प्रतिक्षा संपवली आहे.

दिल्ली विधानसभेसाठी राष्ट्रवादीचे

या यादीत अजित पवारांचे सुपुत्र पार्थ पवार यांचे नाव आहे. मात्र, विधानसभा निवडणुकीत स्टार प्रचारक राहिलेल्या धनंजय मुंडे आणि छगन भुजबळ यांचे नाव नाही. संतोष देशमुख हत्याप्रकरणामुळे सध्या मंत्री धनंजय मुंडे विरोधकांच्या व बीडमधील लोकप्रतिनिधींच्या निशाण्यावर आहेत. याप्रकरणी विरोधकांकडून त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. मात्र, चौकशीत जो कोणी दोषी आढळेल त्याच्यावर कारवाई केली जाईल, असे म्हणत अजित पवारांनी त्यांच्या राजीनाम्याच्या चर्चेला सद्या पूर्णविराम दिला आहे. त्यातच पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या दौऱ्याआधीच धनंजय मुंडे परळीला गेल्यामुळे त्यांना मोदींच्या दौऱ्यापासून दूर ठेवण्यात आल्याचीही चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार, दि. १७ जानेवारी २०२५

खा. कल्याण काळे यांच्याकडून रब्बी हंगाम आढावा बैठक संपन्न

जालना । प्रतिनिधी

खा. कल्याण काळे यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात रब्बी हंगाम, खत टंचाईच्या अनुषंगाने आढावा बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये शेतकरी, कृषि निविष्ठा विक्रेते, शेतकरी संघटना यांच्या काही अडचणी व समस्याबाबत चर्चा करण्यात येवून त्यावर उचित कार्यवाही करण्याच्या सूचना खा. काळे यांनी दिल्या तसेच खत कंपनीने लिकिंग करू नये याबाबत बैठकीमध्ये उपस्थित खत कंपन्यांचे प्रतिनिधींना सुचना दिल्या. तसेच

घाऊक व किरकोळ विक्रेता यांनी देखील कंपन्यांकडून लिंकिंग बाबत विरोध करून ठोस भूमिका घेण्याची सूचना कृषि निविष्ठा विक्रेता संघटेना यांना बैठकी केली बैठकीसाठी जिल्ह्याचे जिल्हा अप्पर अधिकारी रीता मेत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी श्री. गणेश महाडिक, जिल्हा कृषी अधीक्षक कृषि अधिकारी , कृषि विकास अधिकारी . निलेशकुमार भदाने व कृषि विभागातील सर्व अधिकारी, खत कंपनी यांचे प्रतिनिधि, खत विक्रे ता प्रतिनिधि, शेतकरी संघटना प्रतिनिधि, शेतकरी उपस्थित होते.

सिडबीकडून स्टार्ट अपसाठी दोनशे कोटी रुपयांची तरतूद

प्रत्येक प्रादेशिक विभागाला तीस कोटी रुपयांची तरतूद, नवीन स्टार्ट अप धोरण देशातील आधुनिक धोरण ठरणार

मुंबई । प्रतिनिधी

सिडबी स्मॉल इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया) कडून स्टार्ट अपसाठी दोनशे कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. प्रत्येक प्रादेशिक विभागाला तीस कोटी रुपयांची तरतूद करणार आहे. काळाची गरज ओळखून स्टार्ट अप धोरणाचा नवीन मसुदा तयार केला आहे. उद्योजकांना सूचनांसाठी हा मसुदा उपलब्ध करून देण्यात आला आहे हे देशातील आधुनिक धोरण ठरणार तसेच राज्यात नाविन्यता शहराची स्थापना करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स येथील जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत राज्य नाविन्यता सोसायटीच्यावतीने एम्पॉवरींग इनोव्हेशन, एलिव्हेटिंग महाराष्ट्र (,) या संकल्पनेवर आधारित 'राष्ट्रीय स्टार्टअप दिवस' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. ऐ आय () तंत्रज्ञानाच्या यावेळी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून दीप प्रज्वलन मुख्यमंत्री यांनी केले. यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, कौशल्य विकास विभागाचे सचिव गणेश पाटील,आयुक्त प्रदीपकुमार डांगे, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक सतीश सुर्यवंशी, मेरीको लिमिटेडचे अध्यक्ष हर्ष मारीवाला, अपग्रेड अँड स्वदेस फाउंडेशनचे सह संस्थापक रॉनी स्क्रूवाला, नायकाच्या संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी फाल्गुनी नायर यासह ,स्ट्राइड व्हेंचर्स आणि स्ट्राइडवनचे संस्थापक इशप्रीत सिंग गांधी,आयआयटीचे

माजी विद्यार्थी कल्याण चक्रवर्ती, गो इंडिया च्या व्यवस्थापकीय संचालक इप्सिता दासगुप्ता, महाराष्ट्रासह देशभरातील तंत्रज्ञान, कृषी, सेवा क्षेत्र, औषधनिर्माण तसेच पर्यटन अशा विविध क्षेत्रांतील १००० स्टार्टअप या कार्यक्रमात उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले की, नवं उद्योजक आणि महिला उद्योजकांच्या नवकल्पना सक्षम करून महाराष्ट्राची उन्नती करण्यात येणार आहे. देशात स्टार्टअप सुरू झाले तेव्हा ४७१ स्टार्ट अप होते आज देशात एक लाख ५७ हजार आहेत. राष्ट्रीय स्टार्टअप दिनानिमित्त मला अभिमानाने सांगावेसे वाटते की महाराष्ट्र केवळ भारताच्या स्टार्टअप क्रांतीत सहभागी नाही तर त्याचे नेतृत्व करत आहे. राज्यात २६ ००० स्टार्ट अप आहेत. आपण असे अभियान राबवित आहोत की ज्यामध्ये महिला स्टार्टअप मध्ये सर्व पदांवर असतील. देशात जास्त महिला डायरेक्टर असलेले महाराष्ट्र हे पहिलं राज्य आहे. स्टार्टअपमध्ये महाराष्ट्र पहिल्या सात राज्यात आहे असेही ते म्हणाले. मुख्यमंत्री म्हणाले की, उद्योजक, दूरदर्शी गुंतवणूकदार,धोरणकर्ते, इन्क्युबेटर्स, विद्यापीठे हे उद्योग क्षेत्रातील बदलाचे प्रणेते आहेत. इज ऑफ डूईंग बिझनेसमुळे उद्योग कमी वेळात सुरू करण्यामध्ये पारदर्शकता आली आहे. गुंतवणुकीत महाराष्ट्र राज्य हे देशात पहिले आहे.भविष्यातही मानवी हस्तक्षेप न ठेवता पारदर्शक पद्धतीने उद्योजकांना राज्यात शासना बरोबर उद्योग सुरू करण्याची संधी प्राप्त करून दिली जाणार आहे. उद्योग सुरू करताना मुंबई पुणे मध्ये पोषक वातावरण आहे. मुंबई निधीमध्ये आघाडीवर असून, पुणे तंत्रज्ञान आणि नवकल्पनांचे केंद्र आहे. आपली टियर-२ आणि टियर-३ शहरे महाराष्ट्राच्या विकासात मोठा हातभार लावत आहेत. नाशिक, नागपूर, औरंगाबाद आणि कोल्हापूर ही शहरे स्टार्टअप्सना प्रोत्साहन देत आहेत आणि इकोसिस्टम निर्माण करतात असेही ते म्हणाले. विद्यापीठे आणि इन्क्युबेटर्स महाराष्ट्राच्या नवकल्पना स्टार्टअपला बळकटीकरण देणाऱ्या संस्था आहेत. ग्रामीण भागातील नव कल्पना असलेल्या तरुणांनाचा उद्योगात सहभाग वाढवणार असून, उद्योजकांना मार्गदर्शन, नेटवर्किंग, कायदेशीर सहाय्य इत्यादी सेवा देणार्य इन्क्युबेटर्सना स्टार्टअप सुरू करण्यासाठी सहकार्य करणार.शासकीय आणि खाजगी विद्यापीठे या भविष्यातील स्टार्ट अपला बळकटीकरण देणाऱ्या संस्था आहेत. विद्यापीठे आणि इन्क्युबेटर्स हे नोकरी शोधणारे नव्हे तर नोकरी निर्माण करणारे बनवणार असेही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले.

दिंद्रुडच्या माध्यमिक विद्यालयात आनंदनगरी

दिंद्रुड । प्रतिनिधी

येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मोठ्या उत्साहात आनंदनगरी भरवण्यात आली. विद्यार्थ्यांनी वेगवेगळे दुकाने मांडून व्यावहारिक कौशल्य दाखवले. आनंदनगरी मध्ये मुलामुलींनी ४३ दुकाने थाटली होती. ज्यात जवळपास चाळीस हजार रुपयांची उलाढाल झाली. यावेळी विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी सुद्धा मनमुराद आनंद लुटला.

माजलगाव तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, दिंद्रुड येथे १५ जानेवारी रोजी आनंद नगरीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक जी.व्ही. उजगरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी ४३ स्टॉल धारकांनी वेगवेगळ्या प्रकारचे दुकाने तयार केली होती. यामध्ये पानी पुरी,भेळ, खिचडी भजे, गुलाब जामुन,कोरडी भेळ, फ्रुट स्टॉल, वडापाव, भाजीपाला, सौंदर्य

प्रसाधने, थंडपेये आदी प्रकारचे वेगवेगळ्या पदार्थांचे स्टॉल लावले होते.आनंदनगरी मध्ये चि. वाघमारे शुभम यांनी वडापाव सेंटर सुरू करुन तब्बल ८,००० हजार रुपये कमाई केली. तर देशमाने आर्यन यांनी ३००० रुपयांची पाणीपुरी विकली. अशाप्रकारे आनंद नगरीची एकूण आर्थिक उलाढाल ३८३७५ रुपये झाली. आनंदनगरीचे उत्कृष्ट नियोजन व मार्गदर्शन सांस्कृतिक विभाग प्रमुख भोसले के.बी., व्ही.आर.चव्हाण , नाईकनवरे एक.एस ,डावकर बी. व्ही, डी.बी.वायबसे, शिंदे बी. एल, क्रिडा शिक्षक तथा पत्रकार कटारे डी.व्ही, ठोंबरे एस. जी, यांनी केले. यावेळी ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी शेख अनिसा मॅडम व मनोहर कटारे यांनी शाळेला भेट दिली व आनंदनगरीतील विविध पदार्थांचा आस्वाद घेतला. शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व स्टॉल धारकांना पाण्याचे जार, बॅनर, बॅन्च उपलब्ध करून दिले. सर्व विद्यार्थी - विद्यार्थिनींनी आनंदनगरीचा मनसोक्त आनंद घेतला.

बीड रेल्वे स्टेशनला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे

वडवणी । प्रतिनिधी

आज दिनांक १६ /०१/ २०२५ गुरुवार रोजी वडवणी तहसील कार्यालयात तहसीलदार साहेब यांना ॲड गौतमदादा भालेराव मित्र मंडळ बीड जिल्हा , वडवणी तालुका आझाद क्रांती सेना, बहुजन विकास मोर्चा, मानवी हक्क अभियान, वंचित बहुजन आघाडी च्या वतीने मा.तहसिलदार साहेब यांना निवेदन देऊन बीड रेल्वे स्टेशनला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे देण्यात यावे या मागणीसाठी देशाचे जवान मा.अनुरथ सोपानराव वीर हे बीड जिल्हाधिकारी कार्यालय समोर दिनांक ८/०१/२०२५ पासून आमरण उपोषणाला बसले आहेत . डॉ बाबासाहेब आंबेडकर

यांचे नाव देण्यात यावे अशी त्यांची प्रमुख मागणी असून तरी महाराष्ट्र शासनाने डॉ बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्टेशनला नाव देऊन मंजुरी देण्यात यावे अशी मागणी ॲड गौतमदादा भालेराव मित्र मंडळ बीड जिल्हा,व सर्व संघटनेच्या वतीने जाहीर पाठिंबा दिला असून या मागणीची प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन बीड रेल्वे स्टेशनला महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे अन्यथा सर्व आंबेडकर चळवळीतील संघटना समाजाच्या वतीने उग्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल व त्यांची सर्व जबाबदारी शासनाची राहील अशी मागणी केली आहे.यावेळी निवेदन देताना डॉ गौतमदादा भालेराव मित्र मंडळ बीड जिल्हा चे पदाधिकारी व आंबेडकर चळवळीतील संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्याचे नाव कलाक्षेत्रात अधोरेखित करणारा कलावंत : नामदेव काकडे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

नामदेव काकडे यांच्या जहांगीर आर्ट ऑफ गॅलरी येथील चित्र प्रदर्शनीने रसिकांना आकर्षित केले.

बीड जिल्हा संतांची भूमी तशिच ती कलावंतांची खाण म्हणूनही ओळखली जाते. ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या जिल्ह्याने आजपर्यंत अनेक नामवंत कलावंत विविध कलाक्षेत्राला दिलेले आहेत. यापैकीच एक नाव म्हणजे नामदेव काकडे.. अगदी अल्पावधीत देश विदेशामध्ये आपल्या चित्रशैलीने रसिकांच्या मनामध्ये स्वतंत्र स्थान निर्माण करणाऱ्या बनसारोळा ता. केज येथील मनस्वी चित्रकार ,शिल्पकार नामदेव काकडे यांच्या परिवारामध्ये कुठलीही कलात्मक पार्श्वभूमी नसताना लहानपणापासून कुंचल्याचं वेड असणाऱ्या नामदेवने जिद्द आणि परिश्रमाच्या जोरावर कलेच्या क्षेत्रात आपलं स्वतंत्र स्थान निर्माण केलेल आहे. शेतकरी कुटुंबात जन्म झाल्यामुळे लहानपणापासूनच नामदेव निसर्गाच्या सानिध्यात वाढलेला. फरक एवढाच की आपण निसर्ग न्याहाळतो आणि मनस्वी आनंद घेतो. परंतु नामदेवने मात्र निसर्गाच लोभसवान रूप मनात साठवून कुंचल्याच्या रूपाने कागदावर चितारायला सुरुवात केली. लहानपणी असणार कुंचल्याचं आकर्षण मोठेपणी आपली जगामध्ये स्वतंत्र ओळख निर्माण करून देईल याची पुसटशीही कल्पना कदाचित लहानग्या नामदेवला नसेल.. निसर्गाने दिलेलं कलेचे वरदान सातत्याने जपत जपत नामदेव लहानाचा मोठा झाला. आणि हेच सातत्य नामदेवाला कलेच्या विशिष्ट उंचीवर नेऊन पोचवायला कारणीभूत ठरलं. संपूर्ण जगाचं आकर्षण केंद्र असणाऱ्या मुंबईसारख्या मायानगरीत आपल्याही कलेचा उद्धार व्हावा असं प्रत्येक कलावंताचं स्वप्न असतं. त्यातल्या त्यात चित्रकार शिल्पकार यांच्यासाठी जहांगीर आर्ट ऑफ गॅलरी हे ठिकाण म्हणजे जणू पंढरीच.. या जहांगीर गॅलरीमध्ये आपल्या चित्रांचं शिल्पांचं प्रदर्शन भराव आणि रसिकांनी या कलेचा आनंद घेऊन आपल्या कलेच कौतुक करावं असं प्रत्येक कलावंताची मनोमन इच्छा असते. या जहांगीर आर्ट ऑफ गॅलरीमध्ये दिनांक सहा जानेवारी २०२५ ते १२ जानेवारी २०२५ असे सलग सात दिवस चित्रकार नामदेव काकडे यांच्या चित्र प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे नामदेव काकडे यांच्या कलाकृतीचे यापूर्वीही जहांगीर आर्ट ऑफ गॅलरी या ठिकाणी प्रदर्शन झालेले आहे

आणि रसिकांनी उदंड प्रतिसादही दिलेला आहे. परंतु यावर्षी त्यांच्या कलाकृतींना मिळालेला प्रतिसाद पाहून आपल्या बीड जिल्ह्याचे नाव कला विश्वात अधोरेखित करण्याचे काम चित्रकार शिल्पकार नामदेव काकडे यांनी केल आहे यात काही शंकाच नाही. कला विश्वातील अनेक नामवंत व्यक्तिमत्त्वांनी नामदेव काकडे यांच्या चित्र प्रदर्शनीला भेट देऊन त्यांचं कौतुक केलंच परंतु अनेक कलासक्त उद्योग जगतातील नामवंत व्यक्तींनीही नामदेव काकडे यांच्या कलाकृती आपल्या वैयक्तिक दालनात असाव्यात यासाठी मूल्य देऊन अनेक कलाकृती खरेदी केल्या. यामध्ये सर जेजे आर्ट स्कूलचे मूर्तिकला विभागाचे प्रमुख श्री मधुकर वंजारी ,अनुपम बनारसे, जगविख्यात चित्रकार सुहासजी बाहुलकर, राजेंद्र मेहता, नामवंत चित्रकार यशवंत देशमुख, श्री दत्तात्रेय पाडेकर श्री प्रकाश वाघमारे श्री तुकाराम जाधव श्री विशाल नामदेव श्री गणेश चौगुले श्री शिवानंद मोरे श्री नामदेव नागरे श्री पंडित सर श्री विजयराज बोधनकर श्री प्रकाश राजेशिर्के इत्यादी नामवंत रसिकांनी नामदेव काकडे यांच्या चित्रपट भेट दिली आणि कौतुक केले. सर जेजे ऑफ आर्ट स्कूलचे पदवीधर असणारे नामदेव काकडे यांच्या कलाकृती बद्दल लेखक आणि चित्रपट निर्माते सी एस नाग यांनी अत्यंत प्रभावी भाषेत वर्णन केले आहे. नामदेव काकडे यांच्या कलाकृती म्हणजे पारंपारिक आणि आधुनिक चित्रशैली यांचे रोमांचक मिश्रण असून भडक ऍक्रेलिक रंगांमध्ये विपुल स्वरूपाच्या समृद्ध टेपेस्ट्रीचे भव्य दर्शन यामधून रसिकांना होते.जाड इम्पास्टोमध्ये प्रतीकात्मक आणि शैलीकृत फॉर्मचे कल्पनारम्य मिश्रण वापरून रमणीय लँडस्केप त्यांनी तयार केले आहे ज्यामध्ये पाहणाऱ्यांना स्वप्नवत प्रतिमा जाणवते.अमूर्त अभिव्यक्तीवादाचा संपूर्ण पॅलेट वापरून, नामदेव त्याच्या ''लोटस'' मालिकेत आनंद आणि आनंदाने भरलेले फँटस्मगोरियाचे जग तयार करतात, जिथे निर्मितीची प्रत्येक कृती धडधडणाऱ्या चैतन्य आणि निर्दोष आश्चर्याने भरलेली असते. वास्तविकतेच्या निरपेक्ष स्वरूपाचे खंडित दृष्टिकोन न ठेवता सर्वसमावेशक आणि अध्यात्मिक घटक नामदेव काकडे यांच्या चित्रशैलीमध्ये आढळून येतात. एका मनस्वी कलावंताने दुसऱ्या कलावंताचे तोंड भरून केलेले हे कौतुक निश्चितच बीड जिल्हावासीयांसाठी अभिमानाचा क्षण आहे. जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये भरलेल्या चित्रकला आणि ग्राफिक्सच्या माध्यमातून नामदेव काकडे यांनी आपल्या बीड जिल्ह्याचे नाव संपूर्ण कला विश्वामध्ये अधोरेखित केले आहे.

माजलगाव तालुक्यात अतिवृष्टीचे सात मंडळाला आले ८३ कोटी ४८ लाख रु.चे अनुदान

माजलगाव । प्रतिनिधी

शेतकऱ्यांनी आधार कार्ड, बँक पासबुक झेरॉक्स तलाठ्याकडे जमा करावेत - तहसीलदार संतोष रूईकर

तालुक्यातील सात मंडळाला सप्टेंबर २०२३ चे अतिवृष्टी अनुदान आले असून अनेक शेतकऱ्यांनी आधार कार्ड व बँक पासबुक झेरॉक्स तलाठ्याकडे जमा केले आहेत त्यांचे अपडेट चे काम झाले असून सात मंडळाला ८३ कोटी ४८ लाक्ष रुपयाचे अनुदान आले आहे ज्या शेतकऱ्यांचे अनुदान खात्यावर जमा झाले नाहीत अशा शेतकऱ्यांनी आधार कार्ड व बँक पासबुक झेरॉक्स तलाठ्याकडे द्यावे असे आवाहन तहसीलदार संतोष रुईकर यांनी केले आहे.

तालुक्यातील सात मंडळातील ७२ हजार शेतकऱ्यांना सप्टेंबर २०२३ चे अतिवृष्टी अनुदान ८३ कोटी ४८ लक्ष रुपयाचे आले आहे. तालुक्यातील अनेक शेतकरी हे अनुदानापासून वंचित आहेत ७२ हजार शेतकऱ्या पैकी फक्त ५० हजार शेतकऱ्यांनी आधार कार्ड बँक पासबुक तलाठ्याकडे जमा केले आहे. त्यांचे अपडेट चे काम पूर्ण झाले असल्याने या शेतकऱ्यांच्या खात्यावर अतिवृष्टीचे अनुदान जमा होत आहे. जे शेतकरी अनुदानापासून वंचित आहेत अशा शेतकऱ्यांनीआपल्या तलाठी सज्जाच्या तलाठ्याकडे आधार कार्ड व बँक पासबुक झेरॉक्स द्यावे असे आवाहन तहसीलदार संतोष रुईकर यांनी केले आहे.

व्हीके नंबर आलेल्या शेतकऱ्यांनी ईकेवासी करून घ्यावी

व्हीके नंबर आल्यानंतर शेतकरी यांनी आपले सरकार सेवा केंद्रावर जाऊन ईकेवायसी करून घ्यावी अन्यथा रक्कम खात्यात जमा होणार नाही यामुळे शेतकऱ्यांनी ईकेवायसी करून घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

माझ्या नवऱ्याला बळीचा बकरा बनवले, मी कुणाकडे न्याय मागू-मंजिली कराड

बीड । प्रतिनिधी

मस्साजोग सरपंच संतोष देशमुख हत्येच्या प्रकरणाने बीड जिल्ह्यात खळबळ माजवली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी म्हणून वाल्मिक कराडवर मकोका लावण्यात आले असून, बीड न्यायालयाने त्याला २२ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या निर्णयामुळे कराड समर्थक आक्रमक झाले असून, कराडची पत्नी मंजिली कराड यांनी जोरदार प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

मंजिली कराड यांचा आरोप

मंजिली कराड यांनी आपल्या नवऱ्याच्या विरोधातील कारवाईला अन्यायपूर्ण ठरवले आहे. ''कसलेही ठोस पुरावे नसतानाही मकोका लावण्याचा कायदा कसा लागू होऊ शकतो? फक्त लोकांच्या दबावामुळे आणि एक घटनात्मक स्टंटमुळे माझ्या नवऱ्याला फसवून अडकवले आहे,'' असे त्या म्हणाल्या. त्यांनी न्याय मिळवण्यासाठी संघर्ष सुरू ठेवण्याचा इशारा दिला.

'माझ्या नवऱ्याला अडकवण्याचे कारस्थान केले आहे, पण मी न्यायाच्या मार्गावर राहून सत्य समोर आणणार आहे. जर संतोष देशमुख यांच्यासोबत अन्याय झाला असेल, तर माझ्या नवऱ्याला न्याय कोण देणार?'' असे त्या म्हणाल्या.

मंजिली कराड यांनी आपल्या पतीच्या निर्दोषतेचे समर्थन करत सांगितले की, ''सुरेश धस, संदीप क्षीरसागर आणि अन्य काही लोकांचे प्रकरण बाहेर काढून दाखवणार आहे. त्यांनी माझ्या नवऱ्याला बळीचा बकरा बनवले आहे.'' त्यांनी यावेळी मराठा आणि वंजारा समाजाला एकत्र येऊन न्यायासाठी लढण्याचे आवाहन केले आणि या प्रकरणातील योग्य तपास व निर्णयाची अपेक्षा व्यक्त केली. याच दरम्यान, काही लोकांनी बाजू घेतली असून, बीडमध्ये या प्रकरणावर तात्काळ कारवाई करण्यासाठी दबाव वाढवला आहे.

पान ६ वरून...

मैत्रा फाउंडेशनचा शिक्षण

यूट्यूब काढून विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण देऊन त्यांचे शैक्षणिक नुकसान टाळले. याशिवाय राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य पुणे मार्फत दर्जेदार व्हिडिओ निर्मिती स्पर्धेमध्ये तालुकास्तरीय प्रथम क्रमांक मिळविला तर जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक मिळविला.

त्यांचे शैक्षणिक कार्याबरोबरच सामाजिक कार्यामध्येसुद्धा योगदान राहिले आहे. स्वतःच्या प्रत्येक वाढदिवशी ते स्वतःहून रक्तदान करतात. जुण्या व नवीन नाणी व नोटाचा संग्रह करणे हा त्यांचा छंद असू त्यांच्या शैक्षणिक तसेच सामाजिक कार्याची दखल घेऊन यावर्षीचा महर्षी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार त्यांना जाहीर झाल्याची माहिती निवड समितीचे प्रमुख तथा मैत्रा फाउंडेशनचे संस्थापक द.ल.वारे, जिलाध्यक्ष संजय राठोड यांनी दिली.

सदर पुरस्काराचे वितरण १९ जानेवारी रोजी शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार असून मैत्रा फाउंडेशनचे वडवणी तालुकाध्यक्ष धनवे सर, सहकारी बरडे सर, प्रभाळे सर, मुख्याध्यापक मुंडे सर, जेष्ठ शिक्षिका असलेकर मॅडम, यासह सर्व शिक्षक, मित्रपरिवार आणि हितचिंतकांनी त्यांचे अभिनंदन केले असून पुरस्कार वितरणासाठी सर्व मित्रपरिवाराने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

बसमधुन महिला प्रवाशांचे

बीड, पोनि उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि श्रीराम खटावकर, पोउपनि सिध्देश्वर मुरकुटे, ग्रपोउपनि तुळशिराम जगताप, पोह/ मनोज वाघ, कैलास ठोंबरे, राहुल शिंदे, अशोक दुबाले, दिलीप खांडेकर, मपोह/सुशिला हजारे, पोना/विकास वाघमारे, सोमनाथ गायकवाड,बाळु सानप, पोशि/अलिम शेख , अश्विनकुमार सुरवसे, चापोशि/ सुनिल राठोड, व मांजरे यांनी मिळुन केली आहे.

बीड येथे धनगर समाजाचा

प्राध्यापक वकील व शेतकरी मुला मुलींचे व अन्य क्षेत्रातील नोकर व गरजु मुलां-मुलींचा बायोडाटा दि.२८/०२/२०२५ पर्यंत महाराष्ट्रातून मुला मुलींचा बायोडाटा पोस्टाने किंवा प्रत्यक्ष किंवा व्हाट्सअप नंबर वर पाठवण्यासाठी आवाहन युवा मल्हार सेना संस्थापक सचिव ॲड राजु रामभाऊ शिंदे यांनी अंकुशराव येळे ९८९०९०७२६१, प्रा.भगवान माने ७०२००१४१४६, ॲड.राजु शिंदे ९४२२७०२८४३, प्रा.राजेंद्र गाडेकर ७०२०९७७१००, प्रा.भास्कर चादर ९४२०३८९०१४, आण्णासाहेब मतकर ७७९८०९०८१६,तानाजी लासुने सर ९८६०२२५३३८, धवण सर, विशाल देवकते ९८९०६३६३९५, रामदास निर्मळ महाराज ९०४९५९३२५२, प्राध्यापक रेखाताई निर्मळ , संगीताताई मस्के, संतोष वाघमोडे,या नंबरवर व्हॉटॲपद्वारे पाठवावे असे आवाहन राजे मल्हाराव होळकर सामजिक प्रतिष्ठाणचे कार्याध्यक्ष ॲड राजु शिंदे यांनी केले आहे.

फ्लाईंग बर्ड्स शाळेत मकर

कार्यक्रमासाठी मार्गदर्शन व नियोजन शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सारिका बजाज व सौ.ऐश्वर्या चांडक मॅडम यांनी केले. सौ. बनसोडे मॅडम व सौ.खुर्पे मॅडम यांनी सुंदर नियोजन केले व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ शितल काकडे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार सो कावेरी नरवडे मॅडम यांनी मानले.

गंभीर स्वरुपाचा गुन्हा दाखल

स्वरुपाचे गुन्हे दाखल असलेल्यांचे शस्त्र परवाने (बंदूक आणि इतर शस्त्रे) रद्द केले जाणार जाणार असल्याचे श्री. बन्सल यांनी सांगितले. जिल्ह्यात ६५२ अधिकृत शस्त्र परवाने असून, त्याची तपासणी सुरु आहे. शस्त्र परवाना दिल्यानंतर बऱ्याच लोकांवर फौजदारी गुन्हे दाखल असल्याचे आढळून आल्याने तपासणी होत आहे. ही प्रक्रीया अंतिम टप्प्यात असून, लवकरच शख परवाने रद्द करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांना पाठविण्यात येणार असल्याचे श्री. बन्सल यांनी सांगितले.

युवकांनी उच्च ध्येय बाळगावे

पी. आर. थारकर यांनी सांगितले की, शिबिरातून बरेच कांही शिकता येते तशी दृष्टी आपण बाळगली पाहिजे या प्रसंगी विलास सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केले.

कुंबेफळचे सरपंच लिंगेश्वर तोडकर उपसरपंच प्रमोद भोसले यांनी समयोचित भूमिका व्यक्त केली. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोपात प्रा.लोमटे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी कुंबेफळ गावात चांगले रचनात्मक काम करून आपल्या कामातून या गावाशी एक वेगळे नाते प्रस्थापित करावे असे सांगितले. यावेळी ग्रामस्थ विद्यार्थी प्राध्यापक उपस्थित होते.

पुस्तक आणि झाड

आणि जिल्ह्याबाहेर देखील लाखो झाडांची लागवड केली आहे. आतापर्यंत त्यांनी लाखो लोकांना माता जिजाऊ, छत्रपती शिवराय, छत्रपती संभाजी महाराज, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, माता रमाई, माता अहिल्याबाई, माता फातिमा, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, स्वामी विवेकानंद यासारख्या महान व्यक्तींचे चरित्रांचे पुस्तके वाटलेले आहेत. एवढेच नाही तर संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, तुकडोजी महाराज, गाडगेबाबा यासारख्या संतांचे विचार घराघरात पोहोचविणारे ग्रंथ देखील त्यांनी सांप्रदायिक क्षेत्रामध्ये वाटलेले आहेत. मकर मकर संक्रांतीच्या शुभ सण त्यांनी अनोख्या पद्धतीने साजरा करण्याचा पायंडाच आपल्या गावात पाडला आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी त्यांनी आपल्या गावात मकर संक्रांतीच्या सणाच्या निमित्ताने तिळगुळ आणि भेटवस्तू सोबतच झाडे आणि महापुरुष, संतांचे विचाराचे पुस्तके गावातील मातामावल्यांना वाटले. या संक्रातीच्या निमित्ताने गावातील शांतता सुख समाधान आणि भरभराटी टिकून राहावी आणि एकोपा जर राहिला तर गाव यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास एडवोकेट राज पाटील यांनी व्यक्त केला. त्यांच्या पत्नी सौ. अर्चना राज पाटील विद्यमान सरपंच आहेत आपल्या पतीच्या सामाजिक कार्याला त्यांचा खूप मोठा हातभार आहे. गावाचा विकास आणि निसर्ग संवर्धन हे पतीचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी मेहनत घेत असल्याचे एडवोकेट राज पाटील यांच्या पत्नीं सौ अर्चना पाटील यांनी सांगितले.

गावातल्या प्रत्येक महिलेच्या सन्मानासाठी प्रयत्न करणार

मी तीगावची सरपंच असले तरी गावातील सर्व सामान्य माता माऊल्या माझ्या मार्गदर्शक आहेत. मी सर्व महिलांचा सन्मान करूनच गावाचा कारभार करत आहे. या गावातील प्रत्येक महिलेचे विचार आणि स्वातंत्र्य अबाधित राहण्यासाठी मी प्रयत्न करत आहे. कोणत्याही महिलेला त्याच्या हक्क आणि अधिकारापासून दूर ठेवले जाणार नाही याची काळजी मी घेत आहे. गावातील सर्व महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. प्रत्येक महिलेच्या घराघरात महापुरुषांचे विचार गेले पाहिजेत जिजाऊ, सावित्रीबाई, रमाई, अहिल्याबाई, फातिमा, संत जनाबाई, संत ज्ञानेश्वर, तुकोबाराय यांचे विचार घराघरात पोचविण्यासाठी महिलांना आवश्यक आहे ते सर्व साहित्य मी पुरवणार असल्याचे सरपंच अर्चनाताई राज पाटील यांनी व्यक्त सांगितले.

पुढील हंगामात ऊसपीक कर्जदरात होणार वाढ

हेक्टरी ८ हजार ५०० रूपयांच्या वाढीची शक्यता

जुलैनंतर हंगाम २०२५/२६ मध्ये ऊस पीक कर्ज दरात वाढ होणार आहे. हेक्टरी ५ टक्के वाढीचा निर्णय जिल्हास्तरीय पीक कर्ज कमिटीने निश्चित केला असून याबाबत शासनाला प्रस्ताव सादर केला जाणार आहे. यानुसार आडसाली ऊस पिकासाठी हेक्टरी ८ हजार ५०० रुपये, तर खोडवा उस पिकासाठी हेक्टरी ५ हजार ७५० रुपये पीक कर्जात वाढ करण्याची मागणी केली आहे.

शेतकऱ्यांची कर्ज खाती जास्त होत असल्यामुळे सुरू व खोडवा पिकासाठी सरासरी सव्वा लाख रुपये पीक कर्ज मिळावे, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे. नाबार्डकडून पुढील हंगामामध्ये पीक कर्जाकरिता खेळते भांडवली कर्जदाराबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली. यावेळी जिल्हास्तरीय पीक कर्ज कमिटीने ५ टक्के कर्ज दरात वाढ सुचविली आहे. दरवाढीचा निर्णय राज्यपातळीवर, नंतर नाबार्डमध्ये होणार आहे. इंधन, खत व मजुरीचे वाढलले दर तसेच एकूण उत्पादन खर्च वाढल्याने शेतकऱ्यांतून पीक कर्ज दरात वाढ व्हावी, अशी मागणी होत होती. याबाबत कोल्हापूर जिल्हा बँकेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी जी. एम. शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्हास्तरीय कमिटीने पुढील हंगामासाठी ऊस पिकासाठी प्रतिहेक्टरी ५ टक्के वाढीव कर्जदर सुचविला आहे. दर शिफारस करून प्रस्ताव राज्याला पाठविला आहे. सरकारकडून पुढील आदेश आल्यानंतर अंमलबजावणी केली जाणार आहे. असे शिंदे यांनी माहिती दिली. ऊस लागणीसाठी पीक कर्ज सुरुवातीला दिले जाते. लावन ऊस सुरुवातीला तुटतो. खोडवा हंगामाच्या शेवटी तुटतो. यामुळे संस्था पातळीवर ज्यादा खाती होतात. सुरू हंगामासाठी सुरू कर्ज, खावटी कर्ज व आकस्मित कर्ज, तसेच खोडवा पिकासाठी खोडवा कर्ज, खावटी कर्ज, आकस्मित कर्ज अशी सहा खाती, सहा वेगवेगळे पेमेंट दिले जाते. यामुळे संस्था संगणकीकरणात अनेक अडचणी निर्माण होतात. तसेच शासनाला व्याज परतावा देण्यासाठी टप्पे करावे लागतात. यामुळे शेतकऱ्यांचा व संस्थेचाही मेळ बसत नाही.

सोयाबीन खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांची हेळसांड

लातूर : सोयाबीन खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांची हेळसांड होत आहे. चार-चार दिवस मोजमाप करण्यासाठी नंबर लागत नसल्यामुळे शेतकरी हतबल झाला आहे. नंबर लागल्यानंतर सोयाबीन खराब म्हणून परत केले जात असल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो.

लातूर जिल्ह्यासह निलंगा तालुक्यात मोठ्या प्रमाणात सोयाबीन उत्पादक शेतकरी आहे. उडीद-मुगानंतर सर्वाधिक पेरणी सोयाबीन पिकाची होत आहे. तालुक्यात जवळपास ६९ हजार हेक्टरवर सोयाबीन पिकाचा पेरा झाला होता. यापूर्वी सोयाबीनला बाजारामध्ये चांगला भाव मिळत असल्यामुळे बहुतांश शेतकऱ्याचा कल सोयाबीन पिकाचे उत्पादन घेण्यातच वाढला. मात्र, गेल्या तीन-चार वर्षांपासून बाजारातील सोयाबीनचे भाव गडगडल्याने शेतकऱ्यात नाराजी पसरली असून ही नाराजी दूर करण्यासाठी शासनाने ४ हजार ८९२ रुपयांनी (हमी भावाने) सोयाबीन खरेदी करण्यासाठी सुरवात केली आहे. नाफेडमार्फत हे खरेदी सुरू असून यंदा मध्यंतरी झालेल्या पावसामुळे व सोयाबीनच्या काढणीच्या काळात पिकाच्या गुणवत्तेवर परिणाम झाला आहे. नाफेडकडून चांगल्या प्रतीचे सोयाबीन खरेदी केले जात असल्यामुळे खरेदी केंद्रावर माल घालण्यासाठी शेतकऱ्यांची दयनीय अवस्था होताना दिसत आहे. चांगला उच्च प्रतीचा माल असला तरच खरेदी केली जात आहे. थोडाही खराब माल असेल तर तो परत पाठवला जात आहे. त्यामुळे चार-चार दिवस खरेदी केंद्रावर वाहने लावून शेतकऱ्यांना वजन करण्यासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. यंदा पावसात सोयाबीन मोठ्या प्रमाणात भिजले असल्यामुळे गुणवत्तेवर परिणाम झाला आहे.

मशरुमची शेती ठरतेय फायदेशीर; ४५ दिवसात होणार बक्कळ कमाई

देशात मशरुमची शेती ही अधिकाधिक फायदेशीर आहे. या शेतीपासून शेतकरी लाखो रुपयांच्या घरात उत्पन्न मिळवत आहेत. यामुळे याचा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात फायदा होता. देशात मशरुमची शेती ही अधिकाधिक बिहारमध्ये पहायला मिळते. त्याआधी ओडीशा हे राज्य क्रमांक एकवर पहायला मिळत होते. या शेतीसाठी केंद्रातून ७५ टक्के अनुदान दिले जाते. यातून उत्तर प्रदेशात शेतकऱ्यांना मशरूम शेती करण्यासाठी ४० टक्के अनुदान मिळते.

मशरूमच्या लागवडीसाठी मशरुमच्या काही जाती आहेत. त्यापैकी ओएस्टर जातीचे मशरूम हे उत्पादनासाठी अधिकाधिक फायदेशीर आहे. कारण या जातीच्या मशरूमचे उत्पादन केलं तर, उन्हाळ्यात लागवडीसाठी अधिकाधिक फायदा होतो. यामुळे मशरूममध्ये चांगल्या पद्धतीने वाढ होत असून या जातीच्या मशरूमचे वजन हे २५० ग्रॅम असते. तसेच मशरुमची शेती करण्यासाठी मशरूमच्या शेतीतून येणारा नफा जाणून घेणे आवश्यक आहे. मशरूम बीजांचे रोपण केल्यानंतर ३० ते ४५ दिवसांत मशरूमचे उत्पादन होते. एका बॅगपासून शेतकरी १५० ते २०० रुपये मिळवू शकतात. एक बॅग मशरूम उगवण्यासाठी ५० रुपये खर्च येतो. शेतकरी हे मशरूम विकत असतील तर त्यांना १५० रुपये शुद्ध नफा मिळतो. मात्र या शेतीसाठी योग्य हवामानाची आवश्यक असते. तसेच इतरही बाबींची आवश्यकता असणे गरजेचे आहे.मशरूमसाठी आवश्यक बाबी : ओएस्टर जातीसाठी २५ ते ३५ डिग्री सेल्सिअस तापमान हवे. या मशरूम लागवडीतून शेतकरी ४५ दिवसांत उत्पन्न घेऊ शकतात. गव्हाप्रमाणे मशरूमची शेती केली जाते. भुशात ओएस्टरचे बीज टाकून ३० ते ४५ दिवसात मशरूमची शेती केली जाते.

चिंचेच्या लागवडीतून मिळतो मोठा फायदा



चिंच हे फळाचे झाड आहे हे सर्वांनाच माहीत आहे. भारतात आढळणाऱ्या विशेष फळझाडांपैकी एक, चिंचेचा वापर महाराष्ट्र, तामिळनाडू, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशमधील प्रादेशिक पाककृतींमध्ये चवीनुसार मसाला म्हणून केला जातो. रसम, सांभार, वात कुळंबू, पुलिओगरे इत्यादी बनवताना चिंचेचा विशेष वापर केला जातो आणि कोणतीही भारतीय चाट चिंचेच्या चटणीशिवाय अपूर्ण असते. अगदी चिंचेच्या फुलांचा वापर स्वादिष्ट पदार्थ बनवण्यासाठी केला जातो. त्यामुळे चिंचेची लागवडही नफा देणारी आहे.

हवामान आणि जमीन : लागवडीसाठी विशेष जमीन आवश्यक नाही, परंतु चिंचेचे ओलावा असलेल्या खोल गाळ आणि चिकणमाती जमिनीत चांगले उत्पादन मिळते. याशिवाय त्याची वनस्पती वालुकामय, चिकणमाती व क्षारयुक्त जमिनीतही वाढते. चिंचेची वनस्पती उष्णकटिबंधीय हवामानाची आहे. हे गरम वारे आणि उन्हाळ्यात उष्णता सहज सहन करते, परंतु हिवाळ्यात दंव झाडांच्या वाढीवर वाईट परिणाम करते.

फील्ड तयारी : सर्वप्रथम शेताची नांगरणी करून माती मोकळी करावी. नंतर रोपे लावण्यासाठी रिज तयार करा. या कड्यांवरच झाडे लावावी लागतात. चिंचेची झाडे चांगली वाढू शकतात. यासाठी शेत तयार करताना, लागवड करताना कुजलेले शेण किंवा गांडूळ खताची मात्रा मातीत मिसळून खड्डे भरावे लागतात. याशिवाय रासायनिक खतांची मात्रा माती परीक्षणाच्या आधारे दिली जाते.

रोपे तयार करणे : रोपे तयार करण्यासाठी बागायती जमीन निवडा. मार्च महिन्यात शेताची नांगरणी करून, लावणीसाठी बेड तयार केले जातात. बेडच्या सिंचनासाठी नालेही तयार केले आहेत. बेड १५ मीटर लांब आणि रुंद केले जातात. यानंतर मार्चच्या दुसऱ्या आठवड्यापासून एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापर्यंत बिया पेरल्या जातात. बियांची चांगली उगवण होण्यासाठी ते २४ तास पाण्यात भिजत ठेवावेत.

शेतात तयार केलेल्या वाफ्यात चिंचेच्या बिया ६ ते ७ सेमी खोलीवर आणि १५ ते २० सेमी अंतरावर ओळीत पेरल्या जातात. त्यानंतर एका आठवड्यानंतर बियाणे उगवते आणि एक महिन्यानंतर बियाणे अंकुरित होते.

तुती रोपवाटिका आणि बागेचे व्यवस्थापन

तुती लागवडीसाठी मध्यम भारी प्रकारची योग्य पाण्याचा निचरा होणारी जमीन निवडावी. लागवडीपूर्वी माती परीक्षण करून घ्यावे. जमिनीचा सामू ६.५ ते ७.२ पर्यंत असावा, सेंद्रिय कर्ब प्रमाण १ असावे. लागवडीसाठी चिबड किंवा चोपण जमीन टाळावी. सपाट किंवा मध्यम उताराची जमीन तुती लागवडीसाठी योग्य ठरते. बाल्य कीटक संगोपनासाठी तुतीचा एस-३६ तर प्रौढ कीटक संगोपनासाठी व्ही-१ या वाणाची निवड करावी.

पट्टा पद्धत लागवड : तुती लागवड पट्टा पद्धतीने ६ फूट बाय ३ फूट बाय २ फूट किंवा ५ फूट बाय ३ फूट बाय २ फूट अंतरावर केल्यास अनुक्रमे हेक्टरी झाडांची संख्या १२,३४५ आणि १३,८८८ एवढी बसते. लागवड केल्यानंतर दुसऱ्या वर्षी पासून सरासरी वर्षाकाठी कोषाची ८ ते ९ पिके घेता येतील.

आपल्याकडे तिन्ही ऋतूमध्ये भरपूर सूर्य प्रकाश मिळतो, त्यामुळे तुतीची चांगली वाढ होते. महाराष्ट्र राज्यात व्ही-१ तुती जात लोकप्रिय आहे. प्रति एकरी दरवर्षी २५ टन प्रति पानांचे उत्पादन मिळते. जास्त पानांचे उत्पादन मिळविण्यासाठी पट्टा पद्धतीने तुती लागवड करावी. पट्टा पद्धतीने लागवड केल्यास तुती छाटणी, फांद्या तोडणी आणि वाहतूक सोईची होते. फांद्यावरील पानांमध्ये आवश्यक पाण्याचे प्रमाण जास्त काळ राहत असल्यामुळे रेशीम कीटक पाने खातात. पट्टा पद्धतीच्या तुती लागवडीमध्ये धैंचा, बोरू, मूग, उडीद लागवड करता येते. याचा तुती पिकास फायदा होतो.

खड्डा पद्धत : हलक्या जमिनीत तसेच डोंगर उतारावर आठ फूट अंतरावर चर काढून ३ फूट बाय ३ फूट बाय १.५ फूट अंतरावर १.५ फूट बाय १.५ फूट आकाराचे खड्डे करून त्यात तुती रोपांची लागवड करावी. सपाट जमिनीवर ३ बाय ३ बाय १.५ फूट अंतरावर १.५ बाय १.५ फूट अंतरावर लागवड केल्यास हेक्टरी १२,३४५ रोपे बसतात. बैलाच्या साह्याने उभी-आडवी आंतरमशागत करणे सोईचे होते. त्याचबरोबर उत्तम प्रतीच्या तुती पानांचे उत्पादन मिळते.

तीन मीटर ओळ पध्दत : ३ ते ५ एकरांपेक्षा जास्त क्षेत्रावर तुती लागवडीसाठी ही पद्धत फायदेशीर ठरते. लागवडीसाठी ३ मी. बाय ३ मी. बाय ४ मी. आणि ३ मी. बाय ३ मी. बाय ४ मी. अंतराने लागवड केली जाते. एकरी ३,९६९ झाडे बसतात. या पद्धतीचा मुख्य फायदा म्हणजे सर्व बाजूने आंतरमशागतीसाठी पॉवर टिलर किंवा ट्रॅक्टरचा वापर करता येतो. त्यामुळे तण नियंत्रणावरील खर्च आणि वेळेत बचत होते.

खत व्यवस्थापन : नत्रयुक्त खते किंवा नत्र हे अमोनियम सल्फेटच्या स्वरूपात १२५ किलो / एकर/कोषाचे पीक या प्रमाणात दिले तर जमिनीतील फॉस्फरस, लोह आणि झिंक प्रमाणात वाढ होण्यास मदत होते. स्फुरद हे सिंगल सुपर फॉस्फेट ७५ किलो/एकर/कोषाचे पीक या प्रमाणात दिल्यास जमिनीतील स्फुरद मात्रा वाढ होण्यास मदत होते. माती परीक्षण अहवालानुसार पालाश हे म्युरेट ऑफ पोटॅशच्या स्वरूपात द्यावे. तुती बाग ५ वर्षे वयाची झाली असेल तर झिंक सल्फेट १० किलो/एकर/वर्ष कुजलेल्या शेणखतामध्ये मिसळून द्यावे. सेंद्रिय खत ८ टन/एकर/वर्ष दोन समान हप्त्यांमध्ये जून व नोव्हेंबर महिन्यात द्यावे. जमिनीचा सामू आम्लधर्मी असेल तर शेतात चुना मिसळावा लागतो. जमीन अल्कली प्रकारची असेल तर जिप्सम किंवा प्रेसमड जमिनीत मिसळावी. बहुतांशी मराठवाडा विभागातील जमिनीत ८० टक्के जस्त कमतरता जाणवते. हे लक्षात घेऊन १० किलो झिंक सल्फेट प्रति वर्ष दोन समान हप्त्यांत ६ महिन्यांच्या अंतराने तुती बागेस द्यावे. तुती बागेत रासायनिक खत दिल्यानंतर लगेच हलके पाणी द्यावे. तुती बागेस सहा महिन्यांच्या अंतराने ४ टन कुजलेले शेणखत आणि २ टन गांडूळ खत प्रति एकरी द्यावे. १.६ किलो सेरीआयझो आणि ०.४ किलो सेरीफॉस हे १५० ते २०० किलो कुजलेल्या शेणखतासोबत मिसळून सरीमधून द्यावे.

तुती छाटणी : लागवड केल्यानंतर एक वर्षाने जमिनीपासून २० सेंमी अंतरावर छाटणी करावी. ३५ दिवसांनंतर तुती पाने खाद्य म्हणून देण्यास तयार होतात. नंतर अंडीपुंजांतून बाहेर पडलेल्या लहान आळ्यांना ७ दिवसांत दोन कात अवस्था पूर्ण हाईपर्यंत कोवळी तुती पाने खाद्यात द्यावीत. नंतर फांद्या खाद्य तिसऱ्या, चौथ्या कात अवस्थेत आणि ५ व्या वाढीच्या अवस्थेत द्यावे. कोष काढणीनंतर ८० व्या दिवशी छाटणी करावी. अशा क्रमाने वर्षातून ४ वेळा छाटणी व खाद्य देण्याची साखळी पूर्ण करावी. आठ कोषाचे पिके घ्यावेत.

जागतिक दिवस
जागतिक धर्म दिन

महत्वाच्या घटना

- १६०१ : आजच्या दिवशीमुघल सम्राट अकबरने असीरगढ येथे असलेल्या किल्यात प्रवेश केला.
- १७७३ : कॅप्टन जेम्स कुक यांनी अंटार्क्टिक वृत्त पार केले.
- १८७४ : चँग आणि एंग (बंकर) या प्रसिद्ध सयामी जुळ्यांचा मृत्यू. (जन्म:११ मे १८११)
- १९१२ : रॉबर्ट फाल्कन स्कॉट दक्षिण ध्रुवावर पोहचले.
- १९४१ : नेताजी सुभाष चंद्र बोस ह्यांचे जर्मनी ला प्रयाण
- १९४५ : दुसरे महायुद्ध - रशियन फौजांनी पोलंडमधील वॉर्सा शहर उद्ध्वस्त केले.
- १९४५ : भारतीय चित्रपटाचे गीतकार आणि स्क्रिप्ट लेखक जावेद अख्तर यांचा जन्म.
- १९४६ : संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची पहिली बैठक झाली.
- १९५६ : बेळगाव, कारवार आणि बिदर या जिल्ह्यांतील मराठी भाग त्या वेळच्या म्हैसूर राज्यास जोडण्याची घोषणा
- १९८५ : इंग्लंड विरुद्ध माजी भारतीय कर्णधार मो.अझरूद्दीन यांनी दुसरे टेस्ट अर्धशतक मारले.
- १९८९ : जे. के. बजाज हे उत्तरी ध्रुवावर जाणारे पहिले भारतीय ठरले.
- २००१ : अपारंपारिक ऊर्जा क्षेत्रातील 'सूर्या पुरस्कार' शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एम. जी. ताकवले यांना जाहीर.
- २००१ : कथ्थक नृत्यांगना डॉ. रोहिणी भाटे यांना मध्य प्रदेश सरकारचा कालिदास सन्मान जाहीर.
- २००७ : ऑस्ट्रेलिया चे प्रसिद्ध क्रिकेटर माइकल बेवन यांनी आंतराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली.
- २००९ : भारतीय ऑलिम्पिक संघटनेचे सरचिटणीस रणधीर सिंह यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

- १४७१ : भारताचे महान सम्राट कृष्णदेवराय यांचा जन्म.
- १७०६ : बेंजामिन फ्रँकलिन - अमेरिकन संशोधक आणि मुत्सद्दी (मृत्यू:१७ एप्रिल १७९०)
- १८८८ : प्रसिद्ध हिंदी साहित्यिक बाबु गुलाबराय यांचा जन्म.
- १८९५ : विठ्ठल दत्तात्रय तथा वि. द. घाटे - लेखक व शिक्षणतज्ञ, रविकिरण मंडळातील एक कवी (मृत्यू:३ मे१९७८)
- १९०५ : दत्तात्रय रामचंद्र कापरेकर - गणितज्ञ (मृत्यू: १९८६)
- १९०६ : शकुंतला परांजपे - कुटुंब नियोजनाच्या क्षेत्रात अनन्यसाधारण कार्य केलेल्या समाजसेविका (मृत्यू: ३ मे२०००)
- १९०८ : अक्किनेरी लक्ष्मीवर प्रसाद राव ऊर्फ 'एल. व्ही. प्रसाद' - चित्रपट निर्माते व दिग्दर्शक (मृत्यू: २२ जून १९९४)
- १९१७ : एम. जी. रामचंद्रन - अभिनेते व तामिळनडुचे मुख्यमंत्री (मृत्यू:२४ डिसेंबर १९८७)
- १९१८ : सईद अमीर हैदर कमाल नक्वी ऊर्फ 'कमाल अमरोही' - चित्रपट निर्माता, दिग्दर्शक, संवादलेखक, पटकथाकार व कवी (मृत्यू:११ फेब्रुवारी १९९३)
- १९१८ : रुसी मोदी - टाटा स्टीलचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, पद्मभूषण (१९८९) (मृत्यू:१६ मे२०१४)
- १९३२ : मधुकर केचे - साहित्यिक (मृत्यू: २५ मार्च१९९३)
- १९४२ : मुहम्मद अली ऊर्फ कॅशिअस क्ले - अमेरिकन मुष्टियोद्धा. अमेरिकन वर्णभेदाचा निषेध म्हणून त्याने धर्मांतर करुन मुहम्मद अली हे नाव स्वीकारले.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

- १५५६ : हुमायून दुसरा मुघल सम्राट (जन्म: ७ मार्च १५०८)
- १७७१ : गोपाळराव पटवर्धन पेशव्यांचे सरदार (जन्म:)
- १८९३ : रुदरफोर्ड हेस अमेरिकेचे १९ वा राष्ट्राध्यक्ष (जन्म: ४ आक्टोबर १८२२)
- १९३० : अँजेलिना येओवार्ड ऊर्फ 'गौहर जान' गायिका व नर्तिका (जन्म: २६ जून १८७३)
- १९५१ : प्रसिद्ध साहित्यकार ज्योति प्रसाद अग्रवाल यांचे निधन
- १९६१ : पॅट्रिक लुमूंबा काँगोचे पहिले पंतप्रधान (जन्म: २ जुलै १९२५)
- १९७१ : बॅ. नाथ पै स्वातंत्र्य सैनिक व घटनातज्ञ (२५ सप्टेंबर १९२२)
- १९८८ : लीला मिश्रा अभिनेत्री (जन्म: ? ? १९०८)
- १९९५ : डॉ. व्ही. टी. पाटील ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक
- २००० : सुरेश हळदणकर गायक आणि अभिनेते
- २००५ : चीनचे राष्ट्राध्यक्ष झाओ झियांग यांचे निधन.
- २००८ : रॉबर्ट जेम्स तथा 'बॉबी' फिशर अमेरिकन बुद्धिबळपटू व ग्रँडमास्टर (जन्म: ९ मार्च १९४३)
- २०१० : ज्योति बसू प. बंगालचे मुख्यमंत्री (जन्म: ८ जुलै १९१४)
- २०१३ : ज्योत्स्ना देवधर मराठी व हिन्दी लेखिका आणि आकाशवाणी निर्मात्या (जन्म: २७ फेब्रुवारी १९२६)
- २०१४ : रमा दासगुप्ता तथा सुचित्रा सेन बंगाली व हिन्दी चित्रपट भिनेत्री. उत्तमकुमारबरोबर त्यांची जोडी बंगाली चित्रपटांत चांगलीच गाजली. (जन्म: ६ एप्रिल १९३१ पाबना, पाबना, बांगला देश)
- २०१४ : ला भारतीय उद्योजक सुनंदा पुष्कर यांचे निधन.

थोडक्यात

माजलगाव: महाराष्ट्र राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री ना.जयकुमार रावल यांना तालुका दोंडाईचा जिल्हा धुळे येथे वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना कृषी उत्पन्न बाजार समिती सचिव संघ महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष शेगाव बाजार समितीचे सचिव विलासराव फुंडकर,अमरावती विभागाचे सदस्य तथा सचिव दीपक विजयकर,लातूर विभागाचे सदस्य तथा माजलगाव बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे व दोंडाईचे सचिव पंडित पाटील

राष्ट्रीय सेवा योजना हिवाळी शिबिरात विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा

पाटोदा : जय भवानी महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मोजे बांगरवाडी येथे दिनांक १७ जानेवारी २०२५ पासून ते २३ जानेवारी २०२५ पर्यंत राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिर आयोजन करण्यात आले या शिबिराचे उद्घाटन हरिभक्त पारायण लक्ष्मण महाराज सस्ते यांच्या हस्ते होणार आहे तर प्रमुख पाहुणे म्हणून पाटोदा नगरपंचायत च्या नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव नगरपंचायत चे सभापती हनुमंत काळे महाविद्यालयाचे मार्गदर्शक प्राचार्य डॉक्टर विश्वासराव कदम स्थानिक नेमक मंडळाचे सदस्य माननीय दिलीप भाऊ जाधव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित आहेत या शिबिरात सात दिवस वेगवेगळ्या उपक्रमाचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक राष्ट्रीय एकात्मता जलसंवर्धन बालविवाह आरोग्य योगा वृक्षारोपण जलसंधारण राष्ट्रीय एकात्मता इत्यादी विषयावर मान्यवरांचे व्याख्यान आयोजित केलेली आहे या वेगवेगळ्या उपक्रमाचा विद्यार्थ्यांनी या शिबिराच्या माध्यमातून लाभ घ्यावा असे आव्हान महाविद्यालयाची प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर यांनी केले हे शिबिर यशस्वी करण्यासाठी कार्यक्रमाधिकारी डॉक्टर शिवाजीराव काकडे व प्राध्यापक डॉक्टर लोखंडे बीबी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी सहकार्य करीत आहेत या शिबिरात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी व गावकऱ्यांनी सहभाग घ्यावा असे आव्हान प्राचार्य सोमनाथ घाडगे सर यांनी केली आहे

सिद्धेश्वर विद्यालयाचे शासकीय ड्रॉइंग ग्रेड परीक्षेत घवघवीत यश

माजलगाव : दि.२७ सप्टेंबर ते ३१ आक्टोंबर या कालावधीत श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालय या केंद्रावर शासकीय ड्रॉइंग

ग्रेड परीक्षा संपन्न झाली.एकून १२८१ विद्यार्थ्यांनी एलेमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षा दिली.या परीक्षेत श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयाच्या एकून १९ विद्यार्थ्यांनी ए.ग्रेड व ५७ विद्यार्थ्यांनी बी.'ग्रेड प्राप्त केला. मुख्याध्यापक संतोष लिंबकर, उपमुख्याध्यापक शैलेश कंगळे,विभाग प्रमुख रवींद्र खोडवे,पर्यवेक्षक सदाशिव ढगे इत्यादी मान्यवरांनी उपरोक्त विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचे कौतुक केले.व मार्गदर्शक शिक्षक नवनाथ सांगुळे,यांचे अभिनंदन केले.

भारत सरकार नोटरीपदी ॲड. विलास राठोडची नियुक्ती

माजलगाव: दिवाणी व फौजदारी न्यायालय माजलगाव येथील प्रसिद्ध वकील ॲड. विलास भगवान राठोड यांची भारत सरकार नोटरीपदी निवड करण्यात आली आहे. त्यांना ऑनलाईन द्वारे नोटरी अधिकारी निवड झाल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. केंद्र सरकारच्यावतीने जाहीर करण्यात आलेल्या यादीनुसार विविध ठिकाणचे नोटरी पदे जाहीर करण्यात आली. यामध्ये

ॲड. विलास भगवान राठोड यांचे नाव प्रसिद्ध झाले होते. त्यानंतर दि.९ जानेवारी रोजी ऑनलाईनद्वारे नोटरी अधिकारी म्हणून प्रमाणपत्र वाटप करण्यात आले आहे. यामध्ये माजलगाव न्यायालयातील प्रसिद्ध विधीज्ञ ॲड. राठोड यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे विविधस्तरातून अभिनंदन होत आहे.

जाहीरनामा

धारुर येथील श्रीमती नुतन सचिन कदम सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर धारुर

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२४१/२०२५

रतनबाई व इतर वि निरंक

मयताचे नाव : मयत शेषेराव पि. रुस्तुम गडदे रा.मोरफळी ता.धारूर जि. बीड हे दिनांक २७/०४/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारस अर्जदार १. रतनबाई भ्र. शेषेराव गडदे वय ७० वर्षे, धंदा घरकाम रा. मोरफळी ता. धारूर जि. बीड २. केशव पिता शेषेराव गडदे वय ३५ वर्षे, धंदा शेती रा. मोरफळी ता. धारूर जि. बीड ३. राहुल पिता शेषेराव गडदे वय ३० वर्षे, धंदा शेती रा. मोरफळी ता. धारूर जि. बीड यांनी या न्यायालयास मयत शेषेराव पि. रुस्तुम गडदे रा. मोरफळी ता.धारूर जि. बीड हे मयत झाले असून त्यांच्या पश्चात अर्जदारास शासकीय योजनेचा लाभ घेण्याकरीता, व इतर महत्त्वाच्या कामकाजाकरीता, अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा अर्जदार सदरहु अर्जदार मयताचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की. जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत शेषेराव पि. रुस्तुम गडदे रा.मोरफळी ता.धारूर जि. बीड यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक : २२/०८/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :२७/०१/२०२५

स्वाक्षरित
धपाटे व्ही. व्ही.
क. लिपिक

स्वाक्षरित
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर, धारुर

युवकांनी डिजिटल साक्षर होऊन भारताची प्रगती करावी-तहसीलदार तरंगे

घाटनांदुर। प्रतिनिधी

येथील वसुंधरा महाविद्यालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चोथेवाडी येथे तरुणाई भारतासाठी व डिजिटल साक्षरतेसाठी युवक युवती राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्घाटक म्हणून अंबाजोगाईचे तहसीलदार विलास तरंगे बोलत होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष कामधेनू सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष बालासाहेब देशमुख होते तर उद्घाटक तहसीलदार विलास तरंगे होते व प्रमुख पाहुणे प्रसिद्ध कवी बालाजी कांबळे तर मंचावर कामधेनू सेवाभावी संस्थेचे सदस्य वामन जाधव, दत्ताजी वालेकर, पत्रकार संजय रानभरे, सरपंच सौ अरुणा निळे, महादेव निळे ग्रामपंचायत सदस्य अनुरथ भंडे अमोल जाधव, सय्यद पीर साहब बालासाहेब जाधव ,राधाकिसन भंडे, बाळासाहेब निळे ,महादेव जाधव,अशोक जाधव, शिवाजी सोनवणे, धनंजय कस्तुरे ,प्रभारी प्राचार्य डॉ अर्जुन मोरे एनएसएस कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. मकरंद

जोगदंड प्रा. डॉ. संजय खाडप विद्यार्थी प्रतिनिधी शेख शाहिद, स्वप्नाली आव्हाड उपस्थित होते. उद्घाटक तहसीलदार तरंगे यांनी साहित्य ,क्रीडा हे जीवन कसे जगायचे हे शिकवते तर आजच युग हे डिजिटल असून सर्व युवकांनी डिजिटल साक्षर होऊन भारताची प्रगती करावी, असे प्रतिपादन तसेच त्यांनी आपल्या महाविद्यालयीन काळातील सय येते ही कविता विद्यार्थ्यांसमोर सादर केली. प्रमुख पाहुणे कवी कांबळे यांनी जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक ठेवून जीवन हे खूप सुंदर आणि मस्त आहे हे विद्यार्थ्यांना आपल्या कवितेच्या माध्यमातून सांगितले. त्याचबरोबर कांबळे यांनी गावात फळाचा मळा पाहिजे, आनंदाचा सोहळा पाहिजे, गावात एक मंदिर नसेल तरी चालेल पण एक आदर्श महाविद्यालय व शाळा पाहिजे अशी कविता सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात प्रभारी प्राचार्य डॉ. मोरे म्हणाले की, हे वर्ष आमच्या महाविद्यालयाचे रौप्य महोत्सवी वर्ष आहे आणि वर्षी चोथेवाडी येथे एनएसएस शिबीर होत आहे. या गावाला आमचे स्वयंसेवक स्वच्छ ,सुंदर व निर्मळ करतील, असे प्रतिपादन केले. यावेळी विद्यार्थी प्रतिनिधी स्वप्नाली आवाड व शाहिद शेख या विद्यार्थ्यांनी मनोगत केले व्यक्त केले. तसेच महाविद्यालयांमध्ये प्रवेशित असल्याने कोकाटे दांपत्यांचे विशेष सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक एन एस एस कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. मकरंद जोगदंड यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. अनंत कांबळे यांनी केले व आभार एनएसएस कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. संजय खाडप यांनी केले .या कार्यक्रमाला उमेश सरनाईक प्रा. डॉ. बायजा कोटुळे प्रा.डॉ. पांडुरंग रणमाळ प्रा. डॉ. गजानन सवणे प्रा. डॉ. पूनम परदेशी प्रा. योगिता भिसे प्रा.डॉ.अक्षय सायकर प्रा. गणपत कांदे प्रा. रामेश्वर गव्हाणे प्रा. शौकत शेख प्रा. शेटे सह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व एनएसएस स्वयंसेवक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यापीठ नामांतराचा लढा हा अस्मितेचा व अस्तित्वाचा लढा होता – सचिन डोंगरदिवे

पाटोदा । प्रतिनिधी

विद्यापीठ नामांतर चळवळ तब्बल सोळा वर्षे लढली गेली. नामांतर चळवळीत शेकडो जणांनी प्राणांची आहुती दिली. ह्या लढ्यात तळागाळातील अबालवृद्ध पुरुष व महिला सहभागी झाले होते. नामांतर चळवळीचे दमन करण्यासाठी दलित समाजावर अनेक अन्याय अत्याचार करण्यात आले, दलितांची घरे जाळण्यात आली. या चळवळीला काही अंशी यश मिळाले व १९९४ साली विद्यापीठाचा नामविस्तार होऊन मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यात आले.

नामांतराचा लढा हा खऱ्या अर्थाने समाजाच्या अस्मितेचा व अस्तित्वाचा लढा होता असे प्रतिपादन धाराशिवच्या जिल्हा उद्योग केंद्रातील महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकल्प अधिकारी सचिन डोंगरदिवे यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्थेच्या वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात विद्यापीठ नामविस्तार

दिनानिमित्त १६ जानेवारी रोजी आयोजित विशेष व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. गणेश पाचकोरे, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण अतिथींच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. दिलीप गिऱ्हे यांनी केले.सांस्कृतिक विभागामार्फत आयोजित 'विद्यापीठ नामविस्तार दिनाचा इतिहास' या विषयावर बोलताना सचिन डोंगरदिवे यांनी नामांतर चळवळीत प्राणांचे बलिदान दिलेल्या पोचीराम कांबळे, जनार्दन गावडे, संगीता बनसोडे यांच्या बलिदानाची अंगावर शहारे आणणारी कहाणी सविस्तर स्पष्ट केली. अध्यक्षीय समारोप प्राचार्य प्रोफेसर हांगे यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कुशाबा साळुंके यांनी केले. आभारप्रदर्शन प्रा. प्रदीप मांजरे यांनी केले. व्याख्यानास विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

महारेशीम अभियान चित्ररथ जिल्ह्यात रवाना

बीड । प्रतिनिधी

जिल्हा रेशमि उद्योग कार्यालयामार्फत आयोजित महारेशीम अभियानाचे उद्घाटन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी मोकाटे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपाध्यक्ष शामसुंदर पडुळे, उपस्थित होते.यावेळी रेशीम विभागाकडून तयार केलेल्या रथास निवासी उपजिल्हाधिकारी यांनी हिरवी झेंडी दाखवून रेशिम अभियानाची सुरुवात केली. हे अभियान ९ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०२५ पर्यंत असून विभागाकडून गावोगावी कार्यक्रमाव्दारे रेशीम शेतीचे महत्व व अल्प पाण्यावर नगदी पीक असल्याने वर्षातुन ४ ते ५ पीके निघत असल्याने तसेच इतर पारंपारिक पिकापेक्षा जास्त उत्पन्न निघत असल्याचे शेतकरी वर्गात जनजागृती करुन करुन नोंदणी करण्यात येते. नोंदणी केलेल्या अल्पभुधारक शेतक-यांना मनरेगा अंतर्गत ४,८,०००/- १०० टक्के अनुदान देण्यात येते.

जे लाभार्थी मनरेगा अंतर्गत नाहीत बहुभुधारक यांना विभागाकडून सिल्क समग्र योजने अंतर्गत देण्यात येते. राज्यात बीड जिल्हा रेशीम उत्पादनात प्रथम क्रमांकावर आहे जिल्हयात ५४०६ शेतकरी यामध्ये काम करत असून रेशीम उत्पादनामुळे उसतोड कामगार म्हणून ओळख असलेल्या या जिल्हयाची ओळख रेशीम उत्पादक जिल्हा म्हणून होत आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती मार्फत विभागाकडून शासनमान्य कोष खोली बाजारपेठ उभारणी केली असून यामध्ये मोठया प्रमाणात कोष खरेदी (राज्यात प्रथम क्रमांकावर) केले जात आहे. सन २०२३-२४ मध्ये ११०९ मेट्रिक टन कोष शेतक-यांनी विक्री केले असून सन २०२४- २०२५ मध्ये १५ डिसेंबर २४ अखेर १०२२ मे. टन कोषाची खरेदी झाली असून सध्या कोषाचे सरासरी दर ५५०-६५० च्या प्रति क्विंटल असल्याने शेतक-यांचा कल रेशीम शेतीत वाढत चालला आहे. यावेळी रेशीम विकास अधिकारी एस.बी. वराट, ए.एम सोनटक्के, एस.आर. राठोड, एस.व्ही बावणे, एस.आर.पाटील, व्ही. एम मस्के, जी. एम शेळके, डी.बी. मिर्झा तसेच राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त शेतकरी शिवराज काटे, श्री. सपकाळ हे उपस्थित होते. या कालावधीत जास्तीत जास्त शेतक-यांने रेशिम करिता नोंदणी करण्याचे आवाहन रेशीम विकास अधिकारी यांनी केले आहे.

छत्रपती शिवाजी विद्यालयाचे एलिमेंटरी परीक्षेत यश

माजलगाव। प्रतिनिधी

कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य ,मुंबई यांच्या वतीने घेण्यात आलेल्या एलिमेंटरी परीक्षेमध्ये छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे .

या परीक्षेमध्ये सृष्टी गंधनवार, सय्यद मारीया गुलाब, शितल फुके, गायत्री फरताडे, अर्पिता मायकर, शेख अलिषा अन्वर या विद्यार्थीनी उत्तीर्ण झाल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार राधाकृष्ण पाटील, सचिव माजी नगराध्यक्ष अशोक होके पाटील, सतीश दुगड, इनायतखान पठाण, डॉ. योगिता होके पाटील, अभय होके पाटील, मुख्याध्यापक मनोज सोळंके, भास्कर पारगावकर, बालासाहेब झोडगे, आप्पासाहेब होके, विष्णू गडकर, माधव घोलप, दत्ता इंगळे, मुरलीधर भाळशंकर, अनंत राठोड, अनंत शेजुळ, सय्यद गयास, फरजाना पठाण, सत्यप्रिया होके पाटील, स्मिता डाके, शिल्पा शिनगारे, पंकज कळसकर, शेख शहाणूर, तुळशीराम साळवे, ज्ञानेश्वर पवार मिलिंद देशपांडे, दत्ता पांडे दिनकर काळे , प्रथमेश लांडगे यांनी अभिनंदन केले आहे.

कार्यकारी अभियंत्याला ४० हजाराची लाच घेताना पकडले

अंबड । प्रतिनिधी

तक्रारदार अंबड येथील राहणार त्याच्या तक्रारीवरून आरोपी प्रकाश रामकृष्णराव तौर, वय ५३ वर्ष, पद - अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, उपविभाग अंबड जि. जालना वर्ग - १, रा. प्लॉट नं ३, वासुदेव संकुल, संयोगनगर, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर, लाच मागणी पडताळणी- दिनांक १५.०१.२०२५ रोजी केली होती. लाचेची मागणी रक्कम ५०,००० तडजोडीअंती ४०००० रूपये लाच स्वीकृती पकडण्यात कारवाई करण्यात आली. तक्रारदार हे अंबड येथील राहणार असून गुत्तेदार असून त्यांनी अंबड उपविभागाअंतर्गत बसवून दिलेल्या ट्रांसफार्मर चे मागील चार महिन्याचे बिले काढून देण्यासाठी प्रकाश तौर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, एम एस ई बी, उपविभाग अंबड यांनी तक्रारदार यांच्याकडे पंचासमक्ष ५०,०००/- रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ४०,०००/- रुपये स्वीकारण्याचे मान्य करून तक्रारदार यांचेकडून ४०,००० रुपये लाचेची रक्कम पंचा समक्ष स्वीकारली असता त्यांना लाचेच्या रकमेसह रंगेहाथ पकडण्यात आले असून त्यांचेवर पोलीस ठाणे अंबड जि. जालना येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत चालू आहे.सापळा अधिकारी अविनाश घरबुडे, पोलीस निरीक्षक श्री बाळु एस. जाधवर, पोलीस उप अधीक्षक,सापळा पथक - पोलीस अंमलदार शिवाजी जमदाडे, जावेद शेख, शिवलिंग खुळे, गणेश बुजाडे, यांच्यासह इतर अधिकाऱ्यांनी कारवाई केली.

पो.उप निरीक्षक काळे यांचा सत्कार

परतूर । प्रतिनिधी

पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झाल्याबद्दल रोहित काळे या विद्यार्थ्यांचा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कपील आकात यांनी परतुर येथे केला सत्कार . रोहित काळे याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या पोलिस उपनिरिक्षक निवड चाचणी परीक्षा दिली होती. या परीक्षेत तो चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाला आहे. या यशाबद्दल राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जालना जिल्हाध्यक्ष कपिला आकात यांनी त्याचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी नगराध्यक्ष विनायक काळे, नगरसेवक विजय राखे, अखिल काजी, सय्यद आरेफ अली, कदिर भाई कुरेशी, नासेर चाऊस, रज्जाक कुरेशी, संजय राऊत, युवकचे शहराध्यक्ष राजेश तेलगड यांची उपस्थिती होती.

सॅमसंग कंपनीकडून नियमाचा भंग; मोबाईल केले परत

जालना । प्रतिनिधी

परदेशी ऑनलाइन कंपन्यांशी संगनमत करून मोबाईल विक्रेत्यांची फसवणूक करणाऱ्या सॅमसंग कंपनी विरुद्ध भारतातील मोबाईल विक्रेत्यांनी बहिष्काराचे अस्त्र उगारले असून बुधवारी (ता. १५) जालन्या सह संपूर्ण देशभरात विक्रेत्यांनी सॅमसंग कंपनीचे मोबाईल विक्री न करण्याचा निर्णय घेत कंपनीकडे संपूर्ण मोबाईल चा साठा जमा केला. ऑल इंडिया मोबाईल रिटेलर्स असोसिएशनचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा जालना मोबाईल विक्रेता संघटनेचे संस्थापक तिवारी यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील १४५ दुकानदारांनी ५० लाखांपेक्षा जास्त वेगवेगळ्या मॉडेल चे मोबाईल कंपनी च्या वितरकांकडे परत केले. यावेळी मोबाईल विक्रेते दुकानदार यांची उपस्थित होते.

गणेश तिवारी यांनी बहिष्काराबाबत संघटनेची भूमिका विषद करतांना सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी '' व्होकल फॉर लोकल '' असे आवाहन वेळोवेळी केले. मात्र सॅमसंग कंपनीने त्यांच्या आवाहनाचे उल्लंघन करत परकीय कंपन्यांसोबत संगनमताने देशातील व्यावसायिकांचा व्यवसाय संपवण्याचे धोरण अवलंबले आहे. सॅमसंग कंपनीकडून परदेशी ई- कॉमर्स वेबसाइटवर विशेष मॉडेल विक्री केले जात असून ते विक्रेत्यांना विक्रीसाठी उपलब्ध करून दिले जात नाहीत. केवळ काही मॉडेल्स विक्रीसाठी देऊन विक्रेते आणि ग्राहकांची फसवणूक केली जात आहे. तथापि कंपनीने व्यावसायिक मर्यादा ओलांडल्या आहेत. असे नमूद करत गणेश तिवारी म्हणाले, विक्रेत्यांनी वारंवार प्रयत्न करूनही कंपनीकडून धोरणात बदल करण्यासाठी प्रतिसाद मिळत नसल्याने ऑल इंडिया मोबाईल रिटेलर्स असोसिएशन ने कंपनीच्या वितरकांकडे सर्व साठा जमा करण्याचा निर्णय घेतला.असे सांगून किरकोळ विक्रेते या पुढे अन्याय सहन करणार नाहीत, असा इशारा व्यावसायिकांनी दिला.

३० केंद्रावर ९ हजार ७६० विद्यार्थी देणार परिक्षा; तयारी पूर्ण-जिल्हाधिकारी

परीक्षेदरम्यान काही घोटाळा झाल्यास गुन्हा दाखल होणार

जालना । प्रतिनिधी

केंद्रीय परीक्षा एजन्सीमार्फत आयोजित पी. एम. श्री. जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेकरीता जालना जिल्ह्यातील ३० केंद्रावर एकुण ९ हजार ७६० विद्यार्थ्याची शनिवार, दि. १८ जानेवारी, २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेच्या कालावधीत परीक्षा आयोजित करण्यात आलेली आहे. सदरील प्रवेश परिक्षा नियोजनबध्द व शिस्तीत काटेकोरपणे पार पाडावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

केंद्रीय परीक्षा एजन्सीमार्फत आयोजित पी. एम. श्री. जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेच्या पुर्वनियोजनाच्या अनुषंगाने आज

(दि.१५) रोजी जिल्हा दक्षता समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी बैठकीस अपर जिल्हाधिकारी श्रीमती रिता मेत्रेवार, शिक्षणाधिकारी श्रीमती मंगल घुपे, जवाहर नवोदय विद्यालय प्राचार्य श्री. पवार, उपशिक्षणाधिकारी विपुल भागवत, परीक्षा समन्वयक श्री. आंधळे यांच्यासह सर्व गटशिक्षण अधिकारी, परीक्षा केंद्रप्रमुख आणि केंद्र परीक्षा निरीक्षकांची उपस्थिती होती. सदरील केंद्रावर पुरेशा प्रमाणात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. परीक्षा केंद्रावर येणाऱ्या विद्यार्थ्यांची कसुन तपासणी होणार असून, सदरील परीक्षेदरम्यान कुठलाही अनुचित प्रकार होऊ नये, याकरीता उपविभागीय अधिकारी , तहसिलदार, नायब तहसिलदार यांचे भरारी पथक स्थापन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील प्रत्येक परीक्षा केंद्रावर मंडळ अधिकारी, तलाठी यांचे बैठे पथक देखील स्थापन करण्यात आले आहे. परीक्षा केंद्रावर कोणत्याही प्रकारचे इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस, मोबाईल, स्मार्टवॉच, कॅल्क्युलेटर, हेडफोन, मायक्रोफोन, हीडन कॅमेरा इत्यादी इलेक्ट्रॉनिक्स साहित्य वापरण्यास सक्त मनाई करण्यात आलेली आहे. परीक्षा केंद्रावर नियुक्त करण्यात येणारे पर्यवेक्षक, समवेक्षक हे इतर तालुक्यातील असणार आहेत. तसेच पर्यवेक्षक व समवेक्षक यांना देखील मोबाईल अथवा इतर इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस सोबत बाळगण्यास सक्त मनाई करण्यात आलेली आहे. तसेच परीक्षेदरम्यान काही अनुचित प्रकार करणाऱ्या किंवा मदत करणाऱ्या विरुध्द भारतीय नागरिक संहिता २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सांगितले.

बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी बँकात पत निर्माण केली- अविनाश पाठक

बीड । प्रतिनिधी

उमेदच्या बचत गटांनी आपल्या कार्यातून आणि सातत्याने काम करून बँकांचे व्यवहार व्यवस्थित करून बँकामध्ये पत निर्माण केली आहे. आज बँका या बचत गटांना पाहिजे तेवढे कर्ज द्यायला तयार होतात .महिलांना जी आर्थिक शिस्त लागलेली आहे ही शिस्त आणखी चांगले व्हावी अशी अपेक्षा व्यक्त करत महामेळाव्याचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी कौतुक केले. ते उमेदच्या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत बीड जिल्हा स्तरीय सरस विक्री व प्रदर्शन कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते हे प्रदर्शन पुढील पाच दिवस चालणार आहे.

जिल्हास्तरीय सरस विक्री व प्रदर्शनाचे जोरदार उद्घाटन

यावेळी पोलीस अधीक्षक नवनीत कावत, मुख्य कार्यकारी अधिकारी अनित्य जिवने, उमेदच्या प्रकल्प संचालक सौ संगीतादेवी पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वसुदेव सोळंके, निवासी उपजिल्हाधिकारी स्वामी, कॅफो एस. जी. केंद्रे ,उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ज्ञानोबा मोकाटे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना जिल्हाधिकारी अविनाश पाठक म्हणाले की या मेळाव्याच्या माध्यमातून आपली उत्पादने लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी मदत होईल .नागरिकांनीही इतर ठिकाणी खरेदी करण्यापेक्षा बचत गटाची उत्पादने खरेदी करावीत जेणेकरून महिलांना रोजगार उपलब्ध होईल. सध्या जिल्ह्यातील वातावरण गढूळ झाले असले तरी अशा चांगल्या कार्यक्रमातून जिल्ह्याबाहेर एक चांगला संदेश जाईल. आम्ही मेहनतीने पुढे जातो हे राज्यभर कळायला हवे. या आयोजनासाठी ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केले. त्यांचेही अविनाश पाठक यांनी कौतुक केले. यावेळी बोलताना पोलीस अधीक्षक नवनीत कावत म्हणाले की जिल्ह्यामध्ये सध्या दूषित वातावरण झाले आहे. हे वातावरण पूर्ववत आणण्यासाठी मी प्रयत्न करीन मात्र नागरिकांची मला साथ हवी. आपण कुठल्याही पोलीस ठाण्यात गेलात आणि तक्रार दिली तर ती तक्रार घेतली जाईल असा विश्वास मला वाटतो. असे सांगतानाच आम्हाला सर्वांच्या सहकार्याची गरज आहे. त्यातूनच परिस्थिती पूर्व पदावर आणण्यास मदत होईल असे नवनीत कावत म्हणाले. यावेळी प्रास्ताविक करताना संगीता देवी पाटील यांनी बचत गटाच्या माध्यमातून चालू असलेल्या उपक्रमांचा आढावा घेतला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमेदचे शकील यांनी केले. तर शेवटी आभार प्रदर्शन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वसुदेव सोळंके यांनी केले. यावेळी बचत गटाच्या महिला, पत्रकार अधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी जवळपास २०० स्टॉल लागल्याचेही सांगण्यात आले.

वारंवारच्या खंडीत विज पुरवठ्यामुळे कानडीबदन भागात पिके करपू लागली

गावकऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

अंबाजोगाई प्रतिनिधी

तालुक्यातील बनसारोळा उप विभागात पाटील रोहित्रातून विद्युत पुरवठा करण्यात येत असलेल्या मौजे कानडीबदन(ता.केज) भागात गेल्या आठवड्यापासून विद्युत पुरवठा खंडित झाल्याने उभी राहिलेली पिके अक्षरशः करपु लागली आहेत. शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी शेतकरी स्वतःच फ्युज टाकत असल्याने धोका निर्माण झाला आहे. याबाबतची अधिक माहिती अशी की,येथुन जवळच असलेल्या बनसारोळा उपविभागा अंतर्गत असलेल्या पाटील डिपी द्वारे विद्युत पुरवठा करण्यात येतो मौजे कानडीबदन येथील सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन सुरेश साखरे व गावकऱ्यांनी कनिष्ठ अभियंता वैरागे व वायरमन

दराडे यांना वारंवार फोन करून वीज पुरवठ्या बाबतीत चौकशी केली असता दोघेही नेहमीच उडवाउडवीची उत्तरे देतात अनेक वेळा उद्धटपणांने बोलतात आणि या त्यांच्या या उद्दामपणामुळेच हाताशी आलेली हरभरा,गहु,ज्वारी यासह अन्य पिके करपु लागली आहेत. कनिष्ठ अभियंत वैरागे व वायरमन दराडे यांच्या हलगर्जीपणामुळे विद्युत रोहित्रामधील वायरिंग अस्ताव्यस्त तसेच इतर बाबी चुकीच्या असल्याने धोका निर्माण झाला आहे.त्यामुळेच कानडीबदन व परिसरातील शेतकरी ग्रामस्थांमध्ये विद्युत विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांबद्दल संताप व्यक्त होत असून जर पुढील काळात विद्युत? पुरवठा सुरळीत न झाल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

बसमधून महिला प्रवाशांचे दागिने चोरी करणारी महिला जेरबंद

स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी, दहा तोळयाचे सोन्याचे दागिने केले जप्त

बीड । प्रतिनिधी

अंबाजोगाई ते संभाजीनगर प्रवास करत असताना पल्लवी काकडे नावाच्या महिलेचे दहा लाखाचे दागिने चोरी झाले होते. या प्रकरणाची तक्रार बीड शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. याचा तपास करून पोलिसांनी दागिने चोरणाऱ्या महिलेला जेरबंद करून तिच्याकडून दहा तोळे सोने जप्त केले. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी केली.

याबाबत सविस्तर माहिती अशी की श्रीमती पल्लवी काकडे, व्यवसाय नोकरी, रा.साबला ता.केज ह.मु.चंद्रपुर यांनी पो.स्टे.शिवाजीनगर बीड येथे दिनांक ०८/११/२०२४ रोजी तक्रार दिली की, दिनांक ०३/११/२०२४ रोजी ०९०० वा. दरम्यान बीड बस स्थानक येथे संभाजीनगर ते अंबाजोगाई बस मध्य बसल्या असतांना त्यांचे जवळील बॅग मधील सोन्याचे विविध दागिने १६.१ तोळे कि.अं.१०,१६,०००/- रु चे दागिने अज्ञात चोरटयाने चोरुन नेले होते. त्यावरुन पो.स्टे.शिवाजीनगर बीड येथे गुरनं ५६८/२०२४ कलम ३०३(२) भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हयाची नोंद करण्यात आली होती.

पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांनी सदर गुन्हयाचा समांतर तपास करुन गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पोउपनि श्रीराम खटावकर व पथकाला दिले. त्यावरुन पोउपनि खटावकर यांनी सदर गुन्हयाचा स्था.गु.शा.बीड समांतर तपास करीत असतांना दिनांक ०९/०१/२०२५ रोजी गोपनिय बातमीदाराकडुन गुप्त बातमी मिळाली की, सदरचा गुन्हा शिल्पा गब्या चव्हाण रा.पाथर्डी जि.अहिल्यानगर हिने केला असून ती शिरुर कासार येथे आहे. या खात्रीलायक बातमीवरुन संशयीत महिलेचा अभिलेख तपासणी केला असता सदर महिला अशा प्रकारचे चोरी करण्याची सवईची असल्याने सदर महिलेचा शिरुर कासार भागात शोध घेण्यात सुरुवात केली. शिरुर येथुन तिच्या बहिनीच्या घरुन महिलेस ताब्यात घेवुन तिस बारकाईने विचारपुस केली असता तिने गुन्हा केल्याचे कबुल केले. तिला पो.स्टे. शिवाजीनगर यांचे ताब्यात देण्यात आले असुन तिचे ताब्यातुन एकुण १० तोळयाचा सोन्याचे दागिने कि.अंदाजे ५,८२,०००/- रु चा सोन्याचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी नवनीत काँवत पोलीस अधीक्षक,बीड , सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक ◀◀ पान ३ वर

मैत्रा फाउंडेशनचा शिक्षण महर्षी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार गंगाधर डवरे यांना जाहीर

१९ तारखेला शहरातील सामाजिक न्याय भवनात होणार वितरण

वडवणी । प्रतिनिधी

येथील सामाजिक क्षेत्रात कार्यरत मैत्रा फाऊंडेशन दरवर्षी विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना शिक्षण महर्षी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मान करते. यावर्षीचे पुरस्कार नुकतेच जाहीर झाले असून वडवणी तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा चिंचाळा येथील प्राथमिक शिक्षक गंगाधर हरी डवरे यांना जाहीर झाला आहे त्यामुळे डवरे यांचा सर्व स्तरातून

अभिनंदन होत आहे.

डवरे यांनी वडवणी तालुक्यातील सतेवाडीच्या अतिशय ग्रामीण भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत १२ वर्षे तर जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा चिंचाळा येथे मागील ५ वर्षापासून वेगवेगळे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना आनंददायी व गुणवत्तापूर्ण शिक्षण देत आहेत.

डवरे यांनी कोरोना काळात स्वतःचे ज्ञानगंगा ◀◀ पान ३ वर

बीड येथे धनगर समाजाचा राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा -ॲड.राजू शिंदे

बीड । प्रतिनिधी

दिनांक १६.१.२०२५ राजे मल्हाराव होळकर सामाजिक प्रतिष्ठाण यांनी धनगर समाजाचा राज्यस्तरीय वधु-वर परिचय मेळाव्याचे आयोजन १६ मार्च २०२५ रविवार रोजी ११. वा. भगवान प्रतिष्ठाण बार्शी रोड बीड तालुका जिल्हा बीड येथे आयोजन करण्यात आलेले आहे.

आजच्या धकाधकीच्या जीवनात पालकांना पाल्यांचे विवाह जुळविणे दुरापास्त होत आहे. यामुळे आपल्या पाल्यांना योग्य जोडीदार मिळणेसाठी पालकांनी आपल्या डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, ◀◀ पान ३ वर

फ्लाईंग बर्ड्स शाळेत मकर संक्रांति निमित्त माता पालकांसाठी हळदी कुंकवाचा कार्यक्रम संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

फ्लाईंग बर्ड्स शाळेमध्ये माता पालकांसाठी हळदी कुंकवाचा कार्यक्रम दि १६ जानेवारी गुरुवार रोजी संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ.सौ. निळेकर मॅडम,सौ प्रतिभा थिगळे व सौ सुप्रिया चांडक या उपस्थित होत्या.

आजच्या वैज्ञानिक युगात भारतीय संस्कृती टिकून रहण्यासाठी दर्जेदार शिक्षण देण्या बरोबरच विद्यार्थ्यांना आपल्या

परंपरा,संस्कार, सण ,उत्सव याची माहिती व महत्त्व समजावून सांगण्यासाठी फ्लाईंग बर्ड्स स्कूल नेहमीच प्रयत्नशील असते त्याचाच एक भाग म्हणून आज शाळेत मकर संक्रांतीच्या निमित्ताने माता पालकांसह हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले गेले यास माता पालकांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षिका व शिक्षका कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले ◀◀ पान ३ वर

युवकांनी उच्च ध्येय बाळगावे -अर्पिता ठुबे

स्वा.रा.ती.महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबीरास प्रारंभ

अंबाजोगाई । प्रतिनिधी

युवकांनी उच्च ध्येय बाळगून वाटचाल करावी यश हमखास मिळते पण त्यासाठी प्रचंड मेहनत घेतली पाहिजे कोणत्याही कारणाने निराश न होता आपले ध्येय साध्य करण्यासाठी अविरत प्रयत्नशील रहावे असे मत अंबाजोगाई नगरपालिकेच्या मुख्याधिकारी आय.ए. एस.अर्पिता ठुबे यांनी व्यक्त केले.

येथील स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या उद्घाटनप्रसंगी अर्पिता ठुबे बोलत होत्या अध्यक्षस्थानी यो.शि. संस्थेचे जेष्ठ सल्लागार एम.एस.लोमटे होते मंचावर प्राचार्य पी.आर. थारकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा. संचालक विलास सोनवणे सरपंच लिंगेश्वर तोडकर, उपसरपंच प्रमोद भोसले प्रा. ज्ञानेश्वर सोनावणे अनंत वेडे,एस.पी. कुलकर्णी, प्रा.शैलजा बरुरे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना ठुबे म्हणाल्या की, शिबिराच्या माध्यमातून ग्रामीण भागाचे प्रश्न समजून घ्यावेत व या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवन कळावे यासाठी असे शिबीर आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. ◀◀ पान ३ वर

डॉ. आंबेडकरांच्या कार्यातून प्रेरणा घ्यावी - सुशिल कुलकर्णी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शैक्षणिक कार्यासह शोषितांसाठी केलेले कार्य हे मोलाचे असून या त्यांच्या कार्यातून सर्वांनी प्रेरणा घ्यावी असे आवाहन सुशिल कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तार दिना निमित्ताने योगेश्वरी महाविद्यालयात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एम.व्ही.कानेटकर होते.

मंचावर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.आर.व्ही. कुलकर्णी,अजय पाठक कार्यालयीन अधीक्षक अजय चौधरी उपस्थित होते

पुढे बोलताना कुलकर्णी यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान, मराठवाड्याच्या शैक्षणिक विकासासाठी केलेले विशेष प्रयत्न, विद्यापीठ नामांतर चळवळीची पार्श्वभूमी, आंदोलन, संघर्ष व फलश्रुती या विषयी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य कानेटकर यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याची माहिती देवून बाबासाहेबांचे आचार विचार आत्मसात करण्याचे आवाहन केले.प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ.आर.व्ही.कुलकर्णी यांनी केले.कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रा.आदित्य कदम यांनी मानले.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गंभीर स्वरुपाचा गुन्हा दाखल असल्यास शस्त्र परवाना रद्द होणार -पो.अधीक्षक बन्सल

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात एकुण ६५२ अधिकृत शस्त्र परवानाधारक असून, त्यांच्या पडताळणीचे काम सुरु आहे. यापैकी ज्यांच्यावर गंभीर अथवा परवाना दिल्यानंतर गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न होईल, त्यांचे शस्त्र परवाने रद्द केले जाणार असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी दिली.

६५२ शस्त्र परवानाधारकाची तपासणी सुरू

यासंदर्भात बोलतांना श्री. बन्सल पुढे म्हणाले की, गेल्या वर्षभरात १६ गावठी पिस्तूल आणि १०० पेक्षा जास्त तलवारी पोलिसांनी जप्त केल्या आहेत. वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर राज्यात सध्या शस्त्र परवान्यांचा मुद्दा ऐरणीवर आला असून, वेगवेगळ्या जिल्ह्यात शस्त्र परवाने रद्द करण्याची प्रक्रिया सुरु आहे. जालना जिल्हा पोलीस प्रशासनही ॲक्शन मोडवर असून, गंभीर ◀◀ पान ३ वर

पुस्तक आणि झाड दिले संक्रातीचे वाण

तीगावच्या सरपंच अर्चनाताई राज पाटील यांचा सामाजिक उपक्रम

वडवणी । प्रतिनिधी

लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष ऍड राज पाटील हे मागील २५ वर्षापासून सामाजिक क्षेत्रामध्ये नावाजलेले व्यक्तिमत्व आहे. त्यांनी आपल्या गावात एक अनोखी मकर संक्रात साजरी केली. या मकर संक्रातीला गावातील सुमारे ५०० महिलांना त्यांनी संक्रातीचे वाण दिल. या वाणामध्ये केवळ भेटवस्तूच नाही तर तिळगुळा सोबतच पुस्तक आणि एक झाड

महिलांना भेट दिली. त्यांच्या या उपक्रमाचे संपूर्ण बीड जिल्ह्यात कौतुक होत आहे.

एडवोकेट राज पाटील हे मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे विश्वासू सहकारी आहेत. मराठा आरक्षण लढ्यामध्ये मागील चार वर्षापासून ते जरांगे पाटील यांच्यासोबत काम करत आहेत. लढा दुष्काळाशी फाउंडेशनच्या माध्यमातून तसेच वडवणी तालुका विकास समिती यासारख्या संघटनेचे नेतृत्व करत असताना मागील पंचवीस वर्षात राज पाटील यांनी सामाजिक क्षेत्रामध्ये खूप मोठे काम केले आहे. निसर्ग आणि मानवता या दोन गोष्टीची सांगड घालून त्यांनी नेहमी वृक्ष संवर्धन आणि वैचारिक देवाण घेऊन यावर भर दिला आहे. त्यांनी आतापर्यंत बीड जिल्ह्या ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

मेट्रो स्टेशनच्या मागील ५० झोपड्या हटविल्या; कोथरूडमध्येही कारवाई

पुणे । प्रतिनिधी

दिवाणी न्यायालय मेट्रो स्टेशनच्या मागच्या बाजूला डेंगळे पुलालगत मोठ्याप्रमाणात अनधिकृत झोपड्या टाकून अतिक्रमण करण्यात आले होते. त्यावर महापालिकेच्या परिमंडळ दोन तर्फे भल्या सकाळी सहा वाजता कारवाई करून ५० पेक्षा जास्त झोपड्या काढून टाकल्याने. तसेच कोथरूडमधील सुतारदरा भागात कारवाई करून अतिक्रमण काढून टाकून रस्ते मोकळे केले आहेत.

पुणे शहरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याने नागरिकांना रस्ते, पादचारी मार्गावरून चालण्यासाठी जागा शिल्लक नाही. त्याचा फटका पादचारी नागरिकांना बसत आहेच, पण त्याचसोबत वाहतुकीचा वेग कमी होऊन कोंडी होत आहे. शहरातील अतिक्रमणावर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी नाराजी व्यक्त केल्यानंतर जागे झालेल्या प्रशासनाने कारवाई सुरु केली आहे. परिमंडळ दोन मधील घोले रस्ता क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत दिवाणी न्यायालय मेट्रो स्टेशनच्या मागे असलेल्या मोकळ्या जागेत मोठ्या प्रमाणात झोपड्या टाकून नागरिक राहत होते. येथील झोपड्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत होती, याविरोधात प्रशासनाकडे तक्रारी आलेल्या होत्या. तसेच या झोपडपट्टीमुळे डेंगळे पूल भागात वाहतुकीस कोंडी होत होती. त्यामुळे उपायुक्त अविनाश सपकाळ यांच्या नेतृत्वातील मोठा फौजफाटा व जेसीबी, बिगारी घेऊन पहाटे साडेपाचपासून अतिक्रमण कारवाई सुरु करण्यात आली. सकाळी १० पर्यंत ५० पेक्षा जास्त झोपड्या येथून हटविण्यात आल्या. कोथरूड-बावधन क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत सुतारदरा दत्तमंदिर चौक ते चार नळ चौकापर्यंत, छत्रपती शंभूराजे चौक सुतारदरा या भागात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले होते. परिमंडळ दोन व तीनचे अतिक्रमण अनधिकृत निर्मुलन विभाग, कोथरूड पोलिस ठाण्यातील पोलीस, महापालिकेकडील महाराष्ट्र सुरक्षा बल यांच्या मदतीने कारवाई करण्यात आली. यामध्ये दरम्यान हातगाडी ४२, स्टॉल ५, लोखंडी काऊंटर ५ पथारी १७, शेड २७ यावर जेसीबीच्या साह्याने कारवाई केली. शहरात अशा प्रकारे रस्ता पदपथावर अतिक्रमण असणाऱ्यांवर सातत्याने कारवाई केली जाणार आहे, असे उपायुक्त अविनाश सकपाळ यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी अनुभवले छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य

पिंपरी । प्रतिनिधी

जय भवानी, जय शिवाजी,हर हर महादेव, छत्रपती शिवाजी महाराज की जय, छत्रपती संभाजी महाराज की जय. अशा घोषणा देत शूरवीर, महापराक्रमी, धर्मरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्य आणि पराक्रमाची अनुभूती देणारा 'धर्मरक्षक महावीर छत्रपती संभाजी महाराज' हा चित्रपट पाहून 'प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूल'चे विद्यार्थी, पालक भारावून गेले. तसेच चित्रपटात छत्रपती संभाजी महाराज यांची भूमिका साकारणारे अभिनेते ठाकूर अनुप सिंह यांची चित्रपटगृहात अचानक एंट्री झाल्याने विद्यार्थ्यांचा आनंद व्दिगुणित झाला.

परदेशातील कल्पनेमधील सुपर हिरोच्या चित्रपटांना गर्दी होते. मात्र,स्वराज्यासाठी बलिदान देणाऱ्या महापुरुषांच्या जीवन चरित्रावर आधारित चित्रपटांकडे प्रेक्षक पाठ फिरवतात. परंतु, प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूलचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ.जितेंद्र सिंह, डॉ. राजेंद्र सिंह यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्य आणि पराक्रमाची गाथा विद्यार्थ्यांना माहीत व्हावी, या उद्देशाने 'धर्मरक्षक महावीर छत्रपती संभाजी महाराज' हा चित्रपट विद्यार्थ्यांना दाखविण्यासाठी पुढाकार घेतला. पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरातील प्रियदर्शनी शाळेतील विद्यार्थी व पालकांनी चित्रपट पाहण्यासाठी मोठ्या संख्येने गर्दी केली. यावेळी विद्यार्थी व पालकांसाठी अभिनेता अनुप सिंग यांची अचानक झालेली भेट ही एक पर्वणी ठरली. ठाकूर अनुप सिंह यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्याबरोबर चित्रपटही पाहिला. यावेळी चित्रपटांचे निर्माते धर्मेंद्र बोरा, कार्यकारी निर्माते राहुल नेवसे, दिग्दर्शक तुषार शेलार, प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूलच्या व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. निशा सिंह आदी उपस्थित होते.

पुणे जिल्हा हँडबॉल संघटनेचा ज्युनिअर (मुले) संघ राज्यस्तरीय स्पर्धेसाठी रवाना

पुणे । प्रतिनिधी

सांगली येथे येथे दिनांक -१७ जाने. ते १९ जाने. दरम्यान महाराष्ट्र राज्य हँडबॉल अजिंक्य स्पर्धा २०२४-२५ साठी पुणे जिल्हा हँडबॉल संघाची निवड करण्यात आली आहे.

सदरचा संघ हा मा.राजेंद्र राऊत, महासचिव हँडबॉल असोसिएशन महाराष्ट्र ,रुपेश मोरे ,सहसचिव हँडबॉल असोसिएशन इंडिया, राहुल चव्हाण सचिव पुणे जिल्हा हँडबॉल संघटना तानाजी देशमुख सहसचिव पुणे जिल्हा हँडबॉल संघटना यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेला आहे.

संघ पुढील प्रमाणे-

प्रणव येवते, करण मेमाणे ,सुनील सबावत , परेश पाटील, पृथ्वीराज शिंदे , जमीर शेख, प्रणव झिनझुरके, आशुतोष चव्हाण , सिद्धांत चव्हाण , सहर्ष बोराडे , अभिजीत चौधरी, समीर होके, संस्कार कबाडी, विपुल चकवे , आदित्य भालेकर

प्रशिक्षक -अभिजीत राऊत

व्यवस्थापक -मयूर जाधव

एस.टी.बस दुचाकी अपघातात ३ ठार

जेजुरी- बेलसर फाटा उड्डाण पुलाजवळची घटना

आळंदी । प्रतिनिधी

आळंदी पंढरपूर पालखी महामार्गावर बेलसर फाटा जवळ एस. टी. बस व दुचाकीचा भीषण अपघात झाला. या अपघातात दुचाकी वरील तिघे जण जागीच ठार झाल्याचे समजत आहे. या अपघातात रमेश किसन मेमाणे (वय ६०),संतोष दत्तात्रय मेमाणे (वय ४०) व पांडुरंग दामोदर मेमाणे (वय ६५) हे तिघे जण बोरमाळ वस्ती ,पारगाव मेमाणे ,ता पुरंदर जि पुणे येथील रहिवाशी आहेत.

या बाबत माहिती अशी की सासवड जेजुरी रस्त्यावर बेलसर फाटा दरम्यान उड्डाण पुलाचे काम सुरू आहे. दुचाकीवर असणारे तिघे जण रस्ता क्रॉस करून जात असताना एस टी बस व या दुचाकीचा अपघात झाला. ही घटना दुपारी साडे तीन वाजण्याच्या सुमारास घडली. एस टी चालकाने गाडीचा वेग कमी करून बस रस्त्याच्या खाली घेण्याचा प्रयत्न केला मात्र दुचाकी गाडी बस खाली गेल्याने दुचाकीला फरफट नेले. या अपघातात दुचाकी वरील तिघेजण जागीच ठार झाले. तिघांना जेजुरीच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तिघांचा जागीच मृत्यू झाला होता. एकाच वस्तीवरील तिघांचा या अपघातात मृत्यू झाल्याने पारगाव मेमाणे गावावर शोककळा पसरली आहे.

आरोपीच्या लग्नासाठी उच्च न्यायालयाने मंजूर केला तात्पुरता जामीन

पुणे । प्रतिनिधी

विमा कंपनीची दीड कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दाखल असलेल्या गुन्ह्यातील आरोपीला उच्च न्यायालयाने लग्नासाठी तात्पुरता जामीन मंजूर केला आहे. आरोपीला दोन आठवड्यांसाठी जामीन देण्यात आला आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती एन. आर. बोरकर यांनी हा आदेश दिला.

शिवम राजेश तिवारी (वय २८) असे जामीन देण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत तिवारीसह मनोज कुमार रुपकुमार जैन (वय ३८) आणि मोहित सिंह राजेंद्र सिंह (वय २९, सर्व रा. उत्तर प्रदेश) यांच्यावर येथील सायबर पोलिस ठाण्यात विविध कलमांनुसार गुन्हा दाखल आहे. मार्च २०२२ ते एप्रिल २०२४ दरम्यान हा प्रकार घडला होता. या गुन्ह्यात तिवारी याला दोन डिसेंबर २०२४ ला उत्तर प्रदेश येथून अटक करण्यात आली होती.

तिवारी याने जामीन मिळण्यासाठी ड. सत्यव्रत जोशी, ड. विजयसिंह ठोंबरे आणि ड. दिग्विजयसिंह ठोंबरे यांच्यामार्फत उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला होता. बँक खाते उघडणे अर्जदार आरोपीच्या कामाचाच भाग आहे. १६ जानेवारी २०२५ ला त्याचे लग्न असल्याचे बचाव पक्षाने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

गुन्हा दाखल होण्यापूर्वीच जमले होते लग्न -

जामिनाच्या सुनावणीत न्यायालयाने आरोपीचे लग्न हे गुन्हा दाखल होण्यापूर्वी ठरले होते की, गुन्हा दाखल झाल्यानंतर? असा प्रश्न विचारला. गुन्हा दाखल होण्यापूर्वी लग्न ठरले असल्याचे आरोपीच्या वकिलांनी न्यायालयास सांगितले. दोन्ही पक्षांच्या बाजू ऐकून घेत उच्च न्यायालयाने आरोपीला लग्नासाठी दोन आठवड्यांचा मंजूर करून २८ जानेवारीला हजर होण्याचा आदेश दिला. जामीन अर्जावर पुढील सुनावणी ३१ जानेवारीला होणार आहे.

माजी आमदार नारायण वैद्य यांचे अल्पशा आजाराने निधन

पुणे । प्रतिनिधी

भाजपचे विधान परिषदेचे माजी आमदार नारायण वैद्य (वय-९३) यांचे आज अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर वैकुंठ स्मशानभूमित अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, नातवंडे, जावई असा परिवार आहे.



नारायण वैद्य हे जुन्या काळातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक आणि जनसंघाचे कार्यकर्ते होते. त्यांनी तपकीर गल्ली भागातून १९७० ते १९८५ या दरम्यान तीन वेळा पुणे महापालिकेवर जनसंघातर्फे निवडून गेले. त्यांनी १९७४-७५ या वर्षामध्ये उपमहापौरपदही भूषविले होते. पिंपरी चिंचवड नवनिर्माण प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले होते.

नारायण वैद्य यांनी १९८६ मध्ये पदवीधर मतदारसंघातून विधान परिषदेची निवडणूक लढवून ते विधीमंडळात निवडून गेले होते. कसबा पेठेतील तळागाळातील नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासह राज्यभरातील शिक्षण, उद्योगपती यांच्याशी त्यांचे चांगले संबंध होते. तपकीर गल्लीतील नारायण वैद्य क्लासेसही पुण्यात प्रसिद्ध होते, २२ वर्ष त्यांनी विद्यार्थ्यांना इंग्रजी, गणित आणि विज्ञान हे विषय शिकवले.

आंतरशालेय गायन स्पर्धेत जीआयएसचे यश

पिंपळे गुरव : एस. एस. पी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या गणेश इंटरनॅशनल स्कूल आणि सिनियर सेकंडरी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आंतरशालेय गायन स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक पटकावले आहे.

भारती विद्यापीठ इंग्लिश मीडियम स्कूल प्रस्तुत स्वर्गीय डॉ.पतंगराव कदम यांच्या जन्मदिनी आयोजित आंतरशालेय गायन स्पर्धा बालेवाडी येथे आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेला जीआयएसच्या विद्यार्थ्यांनी कोळीगीत 'आई तुझं देऊल' सादर करून प्रेक्षकांची मने जिंकून दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक देखील पटकावले. यासाठी शाळेतील संगीत शिक्षिका सुनीता करडे आणि संगीत शिक्षक अमेय खारकर यांनी विद्यार्थ्यांसाठी विशेष मेहनत घेतली.

या कार्यक्रमाला संस्थेचे चेअरमन एस. बी. पाटील, विश्वस्त गणेश पाटील, प्रशासकीय अधिकारी प्रकाश गायकवाड, सहयोगी संचालक सुनील शेवाळे, मुख्याध्यापिका शिल्पा गायकवाड, पर्यवेक्षिका माधुरी येवले, क्रीडा विभाग पर्यवेक्षक विनोद जगदाळे उपस्थित होते.

पुण्यात १० लाख रुपयांच्या ५०० च्या बनावट नोटा जप्त; रॅकेट उद्ध्वस्त, पाच जणांना अटक

पुणे । प्रतिनिधी

सहकारनगर पोलिसांनी बनावट नोटांचे रॅकेट उद्ध्वस्त केले आहे. त्यांनी पाच आरोपींना अटक करुन त्यांच्या ताब्यातून ५०० रुपयांच्या स्वरुपातील १० लाख ३५ हजार रुपये मूल्याच्या बनावट नोटा हस्तगत केल्या. टोळीतील इतर आरोपींना शोधण्यासाठी पोलिसांचे एक पथक गाझियाबाद येथे गेले आहे.

नीलेश हिरानंद विरकर (३३, रा. चिंचवड), शाहीद कुरेशी (२५), सैफान पटेल (२६), अफजल शहा (१९, सर्व रा. नवी मुंबई), शाहफहड ऊर्फ सोनु फिरोज अन्सारी (२२, रा. पालघर) यांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सहकारनगर पोलिसांचे पथक गस्तीवर होते. त्यावेळी नीलेश हा गडबडीने स्वारगेटकडे जाताना पोलीस अंमलदार अमोल पवार व महेश मंडलिक यांना दिसला. संशय आल्याने पाठलाग करून त्याला पकडण्यात आले. चौकशीवेळी तो पँटच्या खिशात काहीतरी लपवताना दिसला. त्यावेळी ५०० रुपयांच्या नोटांचे बंडल पोलिसांना आढळले. त्याच्याकडून अशा २५० नोटा जप्त करण्यात आल्या. या नोटा त्याने कोपरखैरणे शाहीद, सैफान आणि अफजलकडून मिळवल्या होत्या. या तिघांना पोलिसांनी अटक केली. तेव्हा चौकशीत आरोपी अंसारचे नाव पुढे आले. त्यालाही पोलिसांनी अटक केली. या सर्व २ हजार ७० नकली नोटा बाजारात आल्या असत्या तर त्यांची किंमत सुमारे १० लाख ३५ हजार रुपये झाली असती.

ही कामगिरी अपर पोलीस आयुक्त प्रविणकुमार पाटील, उपायुक्त स्मार्तना पाटील, सहायक आयुक्त राहुल आवारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक छगन कापसे यांचे मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक सागर पाटील, सहायक उप-निरीक्षक बापु खुटवड, पोलीस अंमलदार अमोल पवार, महेश मंडलिक, किरण कांबळे, चंद्रकांत जाधव, बजरंग पवार, अमित पदमाळे, सागर सुतकर, अभिजीत वालगुडे, महेश भगत खंडु शिंदे, योगेश ढोले यांच्या पथकाने केली.

रावेत बांधारा होत आहे मद्यपी दारुड्यांचा अड्डा; अनोळखी व्यक्ती पाण्याद्वारे पसरवत आहेत रोगराई

पुणे । प्रतिनिधी

गेली अनेक महिने रावेत बांधारा मधे (bio medical waste) जैव वैद्यकीय अती घातक कचरा मिसळण्यात येत आहे.

त्या मधे वापरलेल्या सुया, रक्ताचे नमुने, थुंकी लघवी चे नमुने तसेच शळिीश वैधता झालेले औषधँ हि पाण्यात तरंगताना आढळून येत असतात.

(ही रक्त लघवी थुंकी चे नमुने कोणत्या विशिष्ठ रोगाने संक्रमित रुग्णाचे आहेत का? पाण्यात टाकण्याचे काय उद्दिष्ट? केव्हा पासुन सूरू आहे? कोणती लॅब/दवाखाना आहे? यामागे कोण जबाबदार व्यक्ती आहे?)

या पूर्वीही अनेक पर्यावरण संस्थांनी पाण्यात जनावरांची कातडी, मांस, शिंगे, हाडे, ही बाब पाण्यावर तरंगताना प्रशासनास निदर्शनास आणून दिली होती....

दिवंगत कै. विकास पाटील यांनी पर्यावरण बचाव संस्थे मार्फत रावेत येथील अवैध प्रकारे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी अनेक मनपा सोबत कार्यक्रम राबिविले होते.वाढती जलपर्णी, मृत जनावरे , कपडे धुणे, पाण्यात निर्माल्य टाकणे, यामुळे पाण्या मध्ये अती प्रमानात पाणी दूषित होऊन त्याचा अप्रत्यक्ष मानवी आरोग्यावर परिणाम होत आहे.

रावेत इथे अशुद्ध जल उपसा केंद्र आहे व हेच पाणी पुढे जल शुध्दीकरण केंद्र अप्पूघर इथून प्रक्रिया करून ते पुढे पिण्याकरिता पाठविण्यात येते. या बाबतची तक्रार लवकरच स्थानिक पोलीस ठाणे, पर्यावरण प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि मनपा आरोग्य विभागामार्फत सोडविण्याकरिता प्रयत्न करन्यात येईल.

खालील उपाय योजना

१) सुरक्षा रक्षक नेमावे. २) निर्माल्य कुंड ठेवावे. ३) पोलीस गस्त वाढवावी.४) नदी प्रदूषण करणाऱ्यांवर कारवाई व्हावी.५) जैव वैद्यकीय आणि प्राणी यांचे मांस पाण्यात टाकणाऱ्या व्यक्ती संस्थांवर कठोर कारवाई व्हावी

पुण्यात कंटेनर चालकाने पोलीस वाहनांसह नागरिकांना चिरडलं; पोलिसांचा वीस किलोमीटर पाठलाग

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी

पुण्यातील चाकण-शिक्रापूर महामार्गावर कंटेनर चालकाने हैदोस घातला. तब्बल वीस किलोमीटर पोलिसांनी या कंटेनर चालकाचा पाठलाग केला. या दरम्यान अनेक वाहनाला कंटेनर चालकाने धडक दिली. हा सगळा थरार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात देखील कैद झाला आहे. यात चौघे जखमी झाले आहेत, सुदैवानं यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही. संतापलेल्या नागरिकांनी चालकाला पकडून बेदम चोप ही दिला आहे.

या अपघाताची सुरुवात चाकणच्या माणिक चौकातून झाली. तिथं दोन महिलांना कंटेनरने उडवले. त्या भीतीपोटी तो सुसाट वेगाने पळ काढू लागला. काही अंतरावर त्याने एका मुलीच्या पायावरून गाडी घातली. त्यानंतर चाकण पोलिसांनी पाठलाग सुरु केला, हे पाहून चालकाने कंटेनरचा वेग वाढवला. वाटेत येणाऱ्या वाहनांना उडवत तो बेफाम निघाला होता. पुढं शिक्रापूर पोलिसांची गाडी त्याला रोखण्यासाठी थांबली होती. मात्र, कंटेनर चालकाने पोलिसांच्या वाहनाला ही धडक दिली. यात ट्रॅफिक वॉर्डन किरकोळ जखमी झाले आहेत. चाकण ते जातेगाव या वीस किलोमीटर अंतरापर्यंत ही थरारक घटना घडली.

या अपघाताने मोठा गदारोळ निर्माण झाला, अखेर नागरिकांनी कंटेनरला रोखले आणि चालकाला खाली खेचून बेदम चोप दिला. त्यानंतर शिक्रापूर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतलं आणि सर्वांनीच सुटकेचा निश्वास सोडला. सुदैवाची बाब म्हणजे यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. या अपघातानंतर नागरिकांमध्ये मोठा रोष निर्माण झाला आहे.